तापमान
दिवस : 39° उच्च
रात्र : 19° किमान
सूर्योदय : १२ तास ३३ मिनिटे
उगवणे :06:22 AM
मावळणे :06:50 PM
सूर्यास्त : ११ तास २१ मिनिटे
उगवणे : 01:22 PM
मावळणे : 12:18 AM

LIVE
24k सोने प्रति १० ग्रॅम
रू.१,५५,३५०/-
22k सोने प्रति १० ग्रॅम
रू. १,४२,४००/-
चांदी प्रति किलो
रू. २,७०,०००/-
डॉलर प्रति दर
रू.९३.८४

दैनिक चालु वार्ता

**आधी गोळीबार, मग कोयत्याने वार**
येरवड्यात वैमनस्यातून
टोळक्याकडून तरुणाचा खून

(बातमी.... पान क्रमांक ३ वर )

* पुणे * वर्ष : ५ * मुख्य संपादक : डि.एस.लोखंडे पाटील * अंक : २५९ * शुक्रवार दि.१७ एप्रिल २०२६ * पाने : ०४ * किंमत रु.३ * RNI No.: MAHMAR/2021/82895
* Chief Editor : D.S.Lokhande Patil * Pune * Vol 5 * Issue 259 * Friday * 17 April 2026 * Pages 04 * Price Rs.3 * RNI No.: MAHMAR/2021/82895 * E-mail : dainikchaluwartha@gmail.com
* पुणे * नांदेड * छ.संभाजीनगर * बीड * परभणी * हिंगोली * जालना * लातूर * धाराशिव * मुंबई * पालघर * ठाणे * रायगड * रत्नागिरी * अहमदनगर * सोलापूर * सातारा * सांगली * अमरावती * यवतमाळ * वर्धा * वाशिम * चंद्रपूर *

# यापुढे मतदान न करणाऱ्यांना अटक होणार?

## सुप्रीम कोर्टाने दिला महत्त्वाचा निर्णय; स्पष्ट शब्दांत सांगितलं, 'लोकशाहीत...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** लोकशाहीतील सर्वात महत्त्वाचा हक्क मानल्या जाणाऱ्या मतदानाबाबत सर्वोच्च न्यायालयात एक महत्त्वपूर्ण आणि चर्चेचा विषय ठरलेली याचिका सुनावणीसाठी आली. या याचिकेत देशात मतदान अनिवार्य करण्याची मागणी करण्यात आली होती.तसंच, जाणीवपूर्वक मतदान न करणाऱ्या नागरिकांवर शिक्षेची तरतूद करावी आणि त्यांच्याकडून काही सरकारी सुविधा काढून घ्याव्यात, असा प्रस्तावही यामध्ये मांडण्यात आला होता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही मागणी स्पष्टपणे फेटाळत लोकशाहीतील वैयक्तिक स्वातंत्र्याचा पुनरुच्चार केला.

**न्यायालयाचा ठाम दृष्टीकोन**

मुख्य न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या प्रकरणाची दखल घेण्यास नकार देत स्पष्ट शब्दांत सांगितलं की, कोणालाही मतदान करण्यासाठी जबरदस्ती करता येणार नाही. न्यायालयाने नमूद केले की, मतदान हा नागरिकांचा मूलभूत लोकशाही हक्क आहे, कर्तव्य असले तरी तो वापरणे किंवा न वापरणे हा व्यक्तीचा वैयक्तिक निर्णय आहे.

न्यायालयाने यावर भर दिला की, मतदानाचे महत्त्व नागरिकांना पटवून देण्यासाठी व्यापक जनजागृती मोहिमा राबवणे गरजेचे आहे. मात्र, कायद्याच्या माध्यमातून सक्ती करणे हे लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत ठरेल.

**याचिकाकर्त्यांची भूमिका काय होती?**

याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित वकिलांनी न्यायालयासमोर असा युक्तिवाद मांडला की, निवडणूक आयोगाला निर्देश देऊन एक समिती स्थापन केली जाऊ शकते. ही समिती अशा नागरिकांची ओळख पटवू शकते जे कोणत्याही ठोस कारणाशिवाय जाणीवपूर्वक मतदान करत नाहीत. अशा व्यक्तींवर काही निर्बंध घालणे-उदा. सरकारी योजनांतील लाभ मर्यादित करणे-हा उपाय असू शकतो, असे त्यांनी सुचवले.

**व्यवहार्यतेवर न्यायालयाचे प्रश्न**

या प्रस्तावावर मुख्य



न्यायाधीशांनी गंभीर शंका व्यक्त केल्या. त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करत विचारलं की, देशातील अनेक गरीब आणि रोजंदारीवर जगणारे नागरिक कामाच्या गरजेमुळे मतदान करू शकत नाहीत. अशा परिस्थितीत त्यांच्यावर कारवाई कशी करणार? 'मतदान केले नाही म्हणून अशा व्यक्तींना अटक करण्याचा आदेश द्यायचा का?' असा थेट सवालही न्यायालयाने उपस्थित केला.

या निरीक्षणातून न्यायालयाने हे स्पष्ट केले की, कायद्याच्या चौकटीतून सक्ती लादताना सामाजिक आणि आर्थिक वास्तवाचा विचार करणे अत्यावश्यक आहे.

**न्यायमूर्तींच्या उदाहरणातून स्पष्टता**

सुनावणीदरम्यान मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी खंडपीठातील सहकारी न्यायमूर्ती बागची यांचे उदाहरण देत मुद्दा अधिक स्पष्ट केला. त्यांनी सांगितले की, जर मतदान अनिवार्य केले, तर न्यायमूर्ती बागची यांना त्यांच्या मतदारसंघात मतदान करण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये जावे लागेल, ज्या दिवशी सर्वोच्च न्यायालयात महत्त्वाचे कामकाज सुरूअसते.

यावर न्यायमूर्ती बागची यांनीही प्रतिक्रिया देत न्यायालयीन कामकाजाचे महत्त्व अधोरेखित केले. या उदाहरणातून न्यायालयाने दाखवून दिले की, प्रत्येक व्यक्तीची परिस्थिती वेगळी असते आणि एकसारखा नियम सर्वांवर लागू करणे नेहमीच व्यवहार्य ठरत नाही.

**'धोरणात्मक विषय' - न्यायालयाचा निष्कर्ष**

अखेरीस सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, मतदान अनिवार्य करणे हा पूर्णपणे धोरणात्मक विषय आहे. अशा प्रकारचे निर्णय घेणे हे न्यायालयाचे कार्यक्षेत्र नाही. हा विषय विधिमंडळाच्या अधिकारात येतो आणि अशा धोरणांवर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार संसद किंवा राज्य विधानमंडळांना आहे.

न्यायालयाने याचिकाकर्त्यांना सल्ला दिला की, त्यांनी आपली मागणी संबंधित प्राधिकरण किंवा सरकारसमोर मांडावी.

**लोकशाहीतील संतुलनाचा संदेश**

या निर्णयातून सर्वोच्च न्यायालयाने लोकशाहीतील एक महत्त्वाचा संदेश अधोरेखित केला आहे-हक्क आणि कर्तव्य यामधील संतुलन राखणे आवश्यक आहे. मतदानाचे महत्त्व नक्कीच अनन्यसाधारण आहे, परंतु त्यासाठी सक्तीपेक्षा जागरूकता आणि सहभाग वाढवणे हा अधिक परिणामकारक आणि लोकशाहीस अनुरूप मार्ग असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

# नेपाळने लादला भारतावर कर !

## १०० रुपयांहून अधिकच्या खरेदीवर आता द्यावा लागणार 'भंसार' कर

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** भारत-नेपाळ सीमेवर राहणाऱ्या लोकांसाठी आणि छोट्या व्यापाऱ्यांसाठी एक चिंतेची बातमी आहे. नेपाळ सरकारने आता भारतातून होणाऱ्या खरेदीवर कडक निर्बंध लादले आहेत. नव्या नियमानुसार, भारतातून १०० रुपयांपेक्षा जास्त किमतीचे कोणतेही सामान नेपाळमध्ये नेल्यास त्यावर 'भंसार' म्हणजेच सीमा शुल्क भरणे अनिवार्य करण्यात आले आहे.

नेपाळमधील पंतप्रधान बालेंद्र शाह यांच्या नेतृत्वाखालील नवीन सरकारने हा निर्णय घेतला आहे. यापूर्वी छोट्या-मोठ्या घरगुती वस्तूंच्या खरेदीवर इतकी कडक अंमलबजावणी होत नव्हती. मात्र, आता दैनंदिन गरजेच्या वस्तू महागणार आहेत. डाळ, तेल, साखर, भाजीपाला

**बालेन सरकारचा मोठा निर्णय...**



यांसारख्या दैनंदिन वस्तूंच्या खरेदीवरही ५% ते ८०% पर्यंत शुल्क आकारले जाऊ शकते.

**व्यापाऱ्यांची चिंता वाढली**

सीमेजवळील जोगबनी आणि इतर बाजारपेठांमध्ये नेपाळी ग्राहकांची मोठी गर्दी असते. नव्या नियमामुळे या व्यवसायावर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे.

**लाऊडस्पीकरवरून सूचना**

नेपाळी प्रशासनाकडून सीमा भागात लाऊडस्पीकरद्वारे या नियमाची माहिती दिली जात असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

**हा निर्णय का घेतला?**

नेपाळ सरकारने आपल्या देशातील स्थानिक उत्पादनांना चालना देण्यासाठी आणि महसूल गळती रोखण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. सीमेवरील लोकांनी भारतीय बाजारपेठांवर अवलंबून राहण्याऐवजी नेपाळी उत्पादनांना प्राधान्य द्यावे, असा यामागचा उद्देश असल्याचे सांगण्यात येत आहे.

# महिला आरक्षणाचा कायदा त्वरित लागू करा

## उद्धव ठाकरेंची केंद्र सरकारकडे मागणी...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा २०२३ चा कायदा सरकारने त्वरित लागू करावा. मात्र, मतदारसंघांच्या पुनर्रचनेची (सीमांकनाची) प्रक्रिया स्थगित करावी, अशी मागणी ठाकरेसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी केंद्र सरकारकडे केली आहे.

मुंबईत दिलेल्या एका संक्षिप्त निवेदनात ठाकरे म्हणाले, मतदारसंघांची पुनर्रचना हा केवळ एखाद्या राजकीय पक्षाच्या भविष्याचा प्रश्न नसून, तो देशाच्या भविष्याशी संबंधित एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

संसदेने मंजूर केलेला २०२३ चा कायदा त्वरित लागू करा, जो लोकसभा आणि राज्यांच्या



विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण प्रदान करतो.

मात्र, मतदारसंघ पुनर्रचनेची प्रक्रिया सध्या तरी स्थगित केली पाहिजे, कारण हा राष्ट्रीय महत्त्व असलेला विषय आहे. त्यावर अधिक सखोल चर्चेची आवश्यकता आहे, असे त्यांनी म्हटले. दरम्यान, संसदेचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन सुरूआहे.

या अधिवेशनात नारी शक्ती वंदन अधिनियमामध्ये सुधारणा करण्यासाठी आणि त्याची २०२९ मध्ये अंमलबजावणी करण्यासाठी, तसेच सीमांकन आयोग स्थापन करण्यासाठी मांडण्यात आलेल्या तीन विधेयकांवर चर्चा सुरू झाली आहे. महिला आरक्षण कायद्यात आवश्यक बदल करण्यासाठीचे संविधान (१३१ वी सुधारणा) विधेयक गुरुवारी लोकसभेत सादर करण्यात आले.

दोन सामान्य विधेयके देखील सभागृहात सादर करण्यात आली. संविधान सुधारणा विधेयकानुसार, लोकसभेच्या जागांची संख्या सध्याच्या ५४३ वरून वाढवून जास्तीत जास्त ८५० पर्यंत नेली जाईल. २०२९ च्या संसदीय निवडणुकांपूर्वी महिला आरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ही वाढ केली जाईल.




# जगावर नव्या युद्धाचं सावट!

## रशियाने देशांची यादीच केली जाहीर; लिस्ट पाहून युरोपमध्ये खळबळ...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** युक्रेनसोबत सुरु असलेल्या युद्धादरम्यान रशियाने एक यादी जाहिर केली आहे, ज्यामुळे जगभरात खळबळ उडाली आहे. या यादीत ब्रिटन, जर्मनी, डेन्मार्क यांच्या नावाच उल्लेख आहे. रशियाने ज्या देशांवर संभाव्यपणे हल्ले केले जाऊ शकतात, त्यांची यादी जाहीर केली असून, यामध्ये युरोपातील अनेक मोठ्या देशांचं नाव आहेत. या देशांमध्ये युक्रेनला देण्यासाठी ड्रोनची निर्मिती केली जात



असल्याचा रशियाचा दावा आहे.

**यादीत कोणत्या देशांचा समावेश?**

रशियाच्या यादीत जर्मनी, डेन्मार्क, लातविया, लिथुआनिया, नेदरलँड, पोलंड और आणि चेक रिपब्लिकमध्ये ड्रोनची निर्मिती करणाऱ्या अनेक कंपन्यांचा समावेश आहे. याशिवाय जर्मनी, स्पेन, इटली, चेक रिपब्लिक, इस्रायल आणि तुर्की येथे ड्रोनचे सुटे भाग बनवणाऱ्या फॅक्टरींचाही समावेश आहे. रशियाच्या सुरक्षा परिषदेचे डेप्युटी हेड दिमित्री मेदवेदेव यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत धमकीवजा इशारा दिला आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की, 'रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने केलेलं विधान जसंच्या तसं घेतलं पाहिजे. ज्या युरोपीय ठिकाणांवर ड्रोन आणि इतर उपकरणांचे उत्पादन केलं जात आहे, जाते, अशा तळांचा समावेश रशियन सशस्त्र दलांच्या संभाव्य लक्ष्यांच्या यादीत करण्यात

(पान ३ वर...☞)

# चर्चेनंतर इराणी नेत्यांना ठार मारण्याचा पाकचा होता कट

## विमान सोडून बस-ट्रेनने गाठले तेहरान...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** अमेरिका आणि इराणयांच्यातील शांतता चर्चा पुन्हा एकदा इस्लामाबादमध्ये होईल, अशी जोरदार चर्चा सुरू आहे. दरम्यान, इराणी शिष्टमंडळाचे सदस्य प्राध्यापक मोहम्मद मरांडी यांनी एक महत्त्वपूर्ण दावा केला आहे. इस्लामाबादमध्ये अमेरिकेसोबत झालेल्या अनिर्णित शांतता चर्चेनंतर, तेहरानला परतणाऱ्या इराणी शिष्टमंडळाला गंभीर सुरक्षा धोक्यांचा सामना करावा लागला. इराणी राजकीय विश्लेषक मोहम्मद



मरांडी यांनी स्पष्ट केले की, अत्यंत सावधगिरीचा उपाय म्हणून इराणी परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची आणि संसद अध्यक्ष मोहम्मद-बाकेर गालिबाफ यांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने प्रवासातच विमान बदलले. शिष्टमंडळाने तेहरानला जाण्यासाठी बस आणि ट्रेनचा पर्यायी मार्गही निवडला. इराणी शिष्टमंडळासोबत इस्लामाबादला गेलेल्या तेहरान विद्यापीठाचे प्राध्यापक मरांडी यांनी सांगितले की, इस्लामाबादला जात असताना त्यांच्या विमानावर हल्ला होऊ शकतो, अशी थेट धमकी त्यांना मिळाली. प्राध्यापक मरांडी यांनी खुलासा केला की, याच कारणामुळे तेहरानला परतताना शिष्टमंडळाने गुप्तपणे आपले विमान बदलले. मरांडी म्हणाले की, आमचा अमेरिकेवर विश्वास नाही आणि आम्ही युद्धाच्या पुढील फेरीच्या तयारीत खूप व्यस्त आहोत. अमेरिका

(पान ३ वर...☞)



# पालघरात शिवसेनेचा संघटनात्मक मेळावा

## कार्यकर्त्यांना जोमाने कामाला लागण्याचे आवाहन

### डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पालघरात संघटन बळकटीचा निर्धार; प्रीतम राऊत यांच्या प्रवेशाने संघटनेला बळ

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पालघर - प्रतिनिधी
मिलिंद चुरी



**पालघर : बूथस्तरावर संघटन मजबूत करण्याचा निर्धार**

पालघर लोकसभेच्या संघटनात्मक बळकटीसाठी आयोजित शिवसेनेच्या मेळाव्यात बूथस्तरापर्यंत पक्षसंघटना मजबूत करण्याचा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला. डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या मेळाव्यात पदाधिकाऱ्यांना गावोगावी संघटन विस्तारासाठी सक्रिय होण्याचे आवाहन करण्यात आले.

**नेतृत्व आणि निर्णयक्षमतेवर भर**

डॉ.शिंदे यांनी आपल्या भाषणात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने राज्यात वेगळे स्थान निर्माण केल्याचे नमूद केले. जनतेशी असलेली नाळ आणि निर्णयक्षम नेतृत्व हेच यशाचे मुख्य सूत्र असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बीएलए पूर्ण करून सर्वांनी पूर्ण क्षमतेने कामाला लागण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**जिल्ह्यातील प्रश्नांवर लक्ष देण्याची ग्वाही**

मेळाव्यात उपस्थित योगेश कदम यांनी पालघर जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर लक्ष घालण्याची ग्वाही दिली. कार्यकर्त्यांनी कोणतीही अडचण असल्यास थेट संपर्क साधावा, तसेच संघटनात्मक वाढीसाठी शासन पातळीवर सहकार्य केले जाईल, असे त्यांनी सांगितले.

**प्रीतम राऊत यांचा शिवसेनेत प्रवेश**

यावेळी पालघर नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी लढविणारे प्रीतम राऊत यांनी शिवसेनेत प्रवेश केला. डॉ. शिंदे यांच्या हस्ते व योगेश कदम यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. त्यांच्या प्रवेशामुळे स्थानिक पातळीवर संघटनेला अधिक बळ मिळणार असल्याची चर्चा उपस्थितांमध्ये होती.

**पदाधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती**

याप्रसंगी विभागीय संपर्कप्रमुख रवींद्रजी फाटक साहेब, विभागीय सहसंपर्कप्रमुख भाई खाडे, लोकसभा संपर्कप्रमुख पांडुरंगजी पाटील, आमदार राजेंद्रजी गावित आमदार विलासजी तरे, जिल्हाप्रमुख कुंदन संख्ये, वसंत चव्हाण, जिल्हाप्रमुख निलेशजी तेंडोलकर, उपनेते जगदीश धोडी, उपनेत्या ज्योती मेहेर, माजी राज्यमंत्री मनीषाताई निमकर सहसंपर्कप्रमुख केदार काळे, महिला संपर्क संघटिका भारती गावकर, जिल्हा संघटिका वैदेही वाढाण, जिल्हा संघटिका वैष्णवी राहणे, स्नेहल कदम, नगराध्यक्ष उत्तम घरत, नगराध्यक्ष राजेंद्र माच्छी, माजी आमदार अमित घोडा यांसह जिल्ह्यातील विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्याच्या माध्यमातून पालघर जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक पकड अधिक मजबूत करण्याचा स्पष्ट आणि सकारात्मक संदेश देण्यात आला.

# विल्होळी येथील प्राणघातक हल्यातील संशयित दाम्पत्याला अटक



दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नाशिक ग्रा. - प्रतिनिधी
समाधान भावनाथ

**नाशिक :** विल्होळी शिवारात बोलावुन त्याच्याशी झटापट करून त्याच्या हातावर, मानेवर, डोक्याचे पाठीमागील बाजूस कोयत्यानेव दगडाने गंभीर वार करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला असल्याची कबुली दिली आहे. ह्या २ संशयित आरोपीना ह्या गुन्ह्यत अटक करण्यात आली असून न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे. ह्या गुह्यचा पुढील तपास नाशिक तालुका पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक मृदुला नाईक यांचे पथक करीत आहे पोलीस अधीक्षक बाळासाहेब' पाटील, अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर न उपविभागीय पोलीस अधिकारी पेठ विभाग वासुदेवब देसले यांच्या मदूर्शन व सुचनांप्रमाणेस्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक दत्त्रय शिंदे, नाशिक तालुका पो.स्टे च्या पोलीस निरीक्षक मृदूला नाईक, स्थागुशाचे सपोनि नितीन रणदिवे, प्रकाश भालेराव, उपनिरीक्षक शैलेश पाटील, सपोउनि नवनाथ सानप, हवालदार प्रविण काकड, संदिप नागपुरे, रावसाहेब कांबळे, हेमंत गिलबिले, धनंजय शिलावदे प्रदिप बहिरम, संतोष ढोंद, किशोर बोडके, नितीन गांगुर्डे ललिता शिरसाठ, अस्मिता मढवई, नाशिक तालुका पोस्टेचे पोहवा निलेश मराठे, शितल गायकवाड, अनिल गुरडनर, प्रकाश वाजे, मंगेश पानझाडे यांच्या पथकाने हा गुन्हा उघडकीस आणुन कामगिरी केली आहे.

# IBSAR ग्रुप ऑफ कॉलेज, कर्जत येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य आणि उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
ठाणे ग्रामीण - प्रतिनिधी
विकी जाधव



**कर्जत :** कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मोहिनी भट्टाचार्य मॅडम उपस्थित होत्या. त्यांनी प्रमुख पाहुण्या व वक्त्या म्हणून बाबासाहेबांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकत त्यांच्या बहुआयामी कार्याची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. 'बाबासाहेब म्हणजे नेमके कोण?' या प्रश्नाचे प्रभावी उत्तर देत त्यांनी त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी विधी विभागाचे प्रा.ॲड.विशाल धनवटे यांनी बाबासाहेबांचा खडतर आणि संघर्षमय जीवनप्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला. प्रा.अमित गडकरी यांनी 'बाबासाहेबांनी लिहिलेल्या भारतीय संविधानाची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यावश्यक आहे,' असे स्पष्ट मत व्यक्त करत त्यांच्या योगदानाचे स्मरण करून दिले. तसेच ॲड. सुजाता मॅडम यांनी बाबासाहेबांची जयंती केवळ एका दिवसापुरती न ठेवता त्यांच्या विचारांचे दैनंदिन आचरण करण्याचे आवाहन केले. प्रा. अफरोज मॅडम यांनीही संविधान निर्मितीतील बाबासाहेबांच्या योगदानावर भाष्य केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेत बाबासाहेबांच्या जीवनावर भाषणे सादर केली. ऋग्वेद गायकवाड, अमित गायकवाड, महेश भोईर, प्रफुल ढवाळकर, सुरेश बनसोडे, संतोष कुलकर्णी, मंजिरी निमणे, रजनी वाघुळे, रिंकू खोळंबे, दर्शना म्हसे आदी विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले.

यावेळी पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विधी शाखेतील विद्यार्थिनी दर्शना म्हसे हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर संतोष कुलकर्णी याने द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच प्रथम वर्ष विधी विभागातील विद्यार्थिनी आयशा मुलाणी हिने अलीकडील परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल तिचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता कदम व सुजल गायकवाड यांनी केले. तसेच सागर सपकाळे, ऋग्वेद गायकवाड, उन्मेष कदम आणि इतर विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. सदर कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जागरूकता आणि संविधानिक मूल्यांविषयी आदर निर्माण करणारा ठरला.

# शासनाच्या योजना तळागाळातील नागरिकापर्यंत पोहचवणाऱ्या संगणकपरिचालकांचा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसानी सोडवावा

## - संग्राम पाटील डिकळे

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नांदेड - उपसंपादक
गोविंद पवार



### आदिवासी रेला नृत्याने केले स्वागत; गडचिरोली येथे जिल्हा स्तरीय मेळावा उत्साहात संपन्न


**नांदेड :** संगणकपरिचालक संघटनेच्या वतीने गडचिरोली येथे जिल्हा स्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी मागील सुमारे १५ वर्षापासून ग्रामपंचायत संगणकपरिचालक अतिशय तुटपुंज्या मानधन असताना सुद्धा शासनाच्या सर्व योजना गाव, वाडी, वस्ती, तांडा व पाड्यावर राहणाऱ्या सर्व सामान्य नागरिका पर्यंत पोहचवण्याचे काम प्रमाणिकपणे करत असून या संगणकपरिचालकांचा प्रश्न राज्याचे मुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी सोडवून सर्व संगणकपरिचालकांना न्याय देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य संगणकपरिचालक संघटनेचे राज्यअध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे यांनी मेळाव्यातून केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त कि, महाराष्ट्र राज्य संगणकपरिचालक संघटना जिल्हा गडचिरोली च्या वतीने संस्कृती सभागृह गडचिरोली येथे संगणकपरिचालकांचा जिल्हास्तरीय मेळावा उत्साहात संपन्न झाला या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून संघटनेचे राज्यअध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे, कार्यक्रमाचे अध्यक्ष संघटनेचे राज्यउपाध्यक्ष मुकेश नामेवार, विशेष अतिथी म्हणून राज्य सचिव मयूर कांबळे,पंचायत समिती गडचिरोलीचे मा.सभापती मारोतराव इचोडकर, सामाजिक कार्यकर्ते मोहन ठाकरे, राज्य संघटक संतोष कुडले, राज्य तांत्रिक प्रमुख ज्ञानेश्वर सूर्यवंशी, राज्य सहसचिव मारोती चंद्रवंशी, राज्यप्रसिद्धी प्रमुख संग्राम पाटील डिकळे,गडचिरोलीचे जिल्हाध्यक्ष संदीप बुरमवार,लाखनी पंचायत समितीच्या अश्विनीताई मोहतुरे, भंडारा जिल्हाउपाध्यक्ष रूपवसंत मोहतुरे हे व्यासपिठावर उपस्थित होते, अपघातामध्ये दुःखद निधन झालेल्या गौतम निमसटकर व वैशाली निमसटकर यांना श्रद्धांजली अर्पण केली,यावेळी बोलताना संघटनेचे राज्यअध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे म्हणाले कि मागील सुमारे १४ वर्षापासून ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या संगणकपरिचालकांना कर्मचारी दर्जा व किमान वेतन देऊन न्याय द्यावा यासाठी अनेक वेळा आंदोलने केली शासना समोर प्रश्न मांडला परंतु आश्वासना शिवाय शासनाकडून काहीही मिळाले नाही, गडचिरोली सारख्या दुर्गम भागातील सर्व सामान्य नागरिकांपर्यंत शासनाच्या सर्व योजना पोहचवण्याचे काम हेच संगणकपरिचालक करत असून,राज्याचे मुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या प्रश्नात लक्ष घालून संगणकपरिचालकांना न्याय मिळवून द्यावा तसेच प्रधान सचिवांचे ऐकून ग्रामविकासमंत्री जयकुमारजी गोरे यांनी संगणकपरिचालकांना ५० हजार रुपये मासिक वेगळा मोबदला मिळतो असे वक्तव्य विधानपरिषदेत केले असून त्यांनी तसा एक तरी संगणकपरिचालक दाखवण्याचे आवाहन यावेळी केले आहे, यावेळी राज्य सचिव मयूर कांबळे, राज्यउपाध्यक्ष मुकेश नामेवार, राज्य संघटक संतोष कुडले, राज्य तांत्रिक प्रमुख ज्ञानेश्वर सूर्यवंशी, जिल्हाध्यक्ष संदीप बुरमवार, पंचायत समिती सभापती अश्विनी मोहतुरे, मारोतराव इचोडकर, सामजिक कार्यकर्ते मोहन ठाकरे यांनी मनोगत व्यक्त केले, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकेश उंदीरवाडे यांनी तर आभार प्रदर्शन राधेशाम भावने यांनी केले, या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील संगणकपरिचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना विचारात घेतल्याशिवाय शक्तीपीठ महामार्ग प्रकल्प उभारणार नाही - एकनाथ शिंदे

## एकनाथ शिंदे यांच्याकडून सभापती दत्ता मगर यांच्या निवेदनाची दखल

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
माळशिरस - प्रतिनिधी
राजेंद्र पिसे



आमचा विरोध विकासाला आडकाठी नसून शक्तीपीठ महामार्गामुळे शेतकऱ्यांना कोणताही फायदा होणार नाही, उलट शेतकऱ्यांचे जीवनमान संकटात येणार आहे. त्यामुळे मी माळशिरस तालुक्याचा सभापती या नात्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांना निवेदन दिले आहे. आम्हा शेतकऱ्यांना अशा आहे. शिंदे साहेब स्वतः एक शेतकरी असल्याने आम्हा शेतकऱ्यांना नक्कीच न्याय देतील.

– दत्ता मगर ,सभापती (माळशिरस पंचायत समिती)

**नातेपुते :** शक्तीपीठ महामार्गाला सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातून देखील मोठ्या प्रमाणावर विरोध होताना दिसत आहे. याबाबत माळशिरस तालुक्यात ठिकठिकाणी शेतकऱ्यांच्या बैठकांचे सत्र सुरु असून लवकरच मोठे व तीव्र असे आंदोलन केले जाणार असल्याचे शेतकऱ्यांमधुन सांगितले जात आहे.

महाराष्ट्रातील सर्वाधिक चर्चेत असलेला शक्तीपीठ महामार्ग प्रकल्प पुनश्च:एकदा चर्चेत येताना दिसत असून सुरुवातीला पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमधुन तीव्र असा विरोध केल्याने शासनाने या शक्तीपीठ महामार्गत बदल करून नवीन आराखडा तयार करण्यात आला. या आराखड्यानुसार हा शक्तीपीठ महामार्ग सोलापूर जिल्ह्यातून जात असून येथील शेतकरी शेतीवर अवलंबून असल्याने त्याचेवर उपासमारीची वेळ येऊ शकते तसेच माळशिरस तालुक्यात सर्वाधिक सुपीक जमीन असल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात येणार असल्याचे दिसत आहे .त्यामुळे माळशिरस तालुक्यातून देखील या प्रकल्पास विरोध होत असल्या कारणावरुन शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पंढरपूर पक्ष प्रवेशच्या कार्यक्रम निमित्ताने पंढरपूर दौऱ्यावर आले असताना शिवसेनेचे युवा नेते प्रगतशील बागायतदार तथा माळशिरस पंचायत समीतीचे सभापती दत्ता मगर यांनी एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट घेऊन माळशिरस तालुक्यातील मौजे निमगांव येथून जात असलेल्या शक्तीपीठ महामार्गाला शेतकऱ्यांमधुन होत असलेल्या विरोधाची सविस्तर माहिती दिली. तसेच याबाबतचे निवेदन एकनाथ शिंदे यांना देण्यात आले.

सदर निवेदनाची तात्काळ दखल घेऊन सभापती दत्ता मगर यांना अश्वासित केले की, लवकरच सर्व शेतकरी व सबंधित अधिकारी यांचे समवेत बैठक घेऊन याबाबत निर्णय घेण्यात येईल. तसेच शेतकऱ्यांना विचारात घेतल्याशिवाय कोणताही प्रकल्प उभारणार नाही तसेच शेतकऱ्यांना विश्वासात न घेता शक्तीपीठ महामार्ग प्रकल्प लादला जाणार नसल्याचे सांगण्यात आले.

# 'तातडीची विशेष सभा' की नियमांचा भंग?

## ३ दिवसांची नोटीस नाही - पालघर नगरपरिषदेवर बेकायदेशीरतेचा आरोप

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पालघर - प्रतिनिधी
रवि राठोड




**पालघर :** पालघर नगरपरिषदेची दि.१६ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली 'तातडीची विशेष सभा' वादाच्या भोवऱ्यात सापडली असून, नगरसेवक तथा आरोग्य सभापती अमोल पाटील यांनी ही सभा बेकायदेशीर असल्याचा ठपका ठेवला आहे. दि. ३ एप्रिल २०२६ रोजी काढलेल्या नोटीसीनुसार ही सभा बोलावण्यात आली आहे. मात्र, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ८१ (४) (अ) नुसार विशेष सभेसाठी किमान तीन दिवसांची स्पष्ट नोटीस देणे बंधनकारक असताना, या प्रकरणात त्या नियमांचे पालन झाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच 'तातडीची विशेष सभा' म्हणून ही बैठक घेण्यात येत असली तरी, विषयपत्रिकेतील मुद्दे कोणत्याही निकडीच्या परिस्थितीत मोडत नसल्याचे पाटील यांनी नमूद केले आहे. त्यामुळे कलम ८१ (४) (ब) अंतर्गत तातडीची सभा घेण्याचे औचित्यच संशयास्पद ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या सर्व पार्श्वभूमीवर मुख्याधिकारी व सभा अधिक्षक यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, नोटीस व विषयपत्रिकेमधील विसंगतीमुळे प्रशासनाच्या कारभारावरही टीका होत आहे.

नगरसेवक अमोल पाटील यांनी सदर सभा तात्काळ रद्द करण्याची मागणी केली असून, यासंदर्भात जिल्हाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. आता या प्रकरणात प्रशासन काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग मार्फत RTE २५% सवलत
## कागद पत्र पडताळणी व प्रवेशासाठी पालकांची धावपळ...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पिंपरी चिंचवड - प्रतिनिधी**
**केशव पाळवदे**



**पिंपरी चिंचवड :** शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) राज्यातील खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेसाठी काढण्यात आलेल्या सोडतीतून एकूण १ लाख ५ हजार ५८२ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला आहे. पहिल्या फेरीत पात्र विद्यार्थ्यांचे कागद पत्र पडताळणी व प्रवेशासाठी २०/०४/२०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. आज फकीरभाई पानसरे पिं.चिं.मनपा.उर्दू प्राथ. शाळा. खंडोबा माळ आकुर्डी. येथे कागद पत्र पडताळणी साठी पालकांनी पहाटे ०३:०० वाजल्या पासून रांगा लावल्या होत्या. निवड समितीच्या सूचनेप्रमाणे सकाळी १०:३० वाजता पालकांना ध्वनी प्रक्षेपणाद्वारे माहिती देण्यात आली. एकदम व्यवस्थित नियोजन करण्यात आले, या साठी ज्या समितीला अधिकार देण्यात आले आहे,त्यामधील अधिकारी यांनी सर्व विद्यार्थी पालकांना टोकण पद्धतीने कागद पत्र पडताळणी साठी योग्य मार्गदर्शन केले. त्यानुसार त्यांना टोकण देण्यात आले. पहिल्या दिवशी दोनशे पालकांना टोकण देण्यात आले.त्यानंतर पुढील दिवसासाठी १५०(दीडशे) प्रमाणे टोकण देण्यात आले आहेत.पूर्णतः एक आठवड्याचे नियोजन करण्यात आले. त्यामधील मार्गदर्शन करणारे अधिकारी. शिंदे सर, जाधव सर, मोहिते सर यांनी पालकांना मोलाचे सहकार्य केले आहे.

# आधी गोळीबार, मग कोयत्याने वार
## येरवड्यात वैमनस्यातून टोळक्याकडून तरुणाचा खून

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**




**पुणे :** वैमनस्यातून तरुणावर पिस्तुलातून गोळीबार, तसेच कोयत्याने वार करून खून करण्यात आल्याची घटना मध्यरात्री येरवडा परिसरात घडली. या प्रकरणी आरोपींविरोधात विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. गौरव गणेश तेलंगी (वय १८, सध्या रा. बिंडसर वस्ती, नऱ्हे, मूळ रा. शिवाजीनगर रेल्वे स्थानकाजवळ) असे खून झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी तौफीक शेख, समीर शिंदे, राजन दोरास्वामी (तिघे रा. शिवाजीनगर रेल्वे स्थानकाजवळ) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सयान निजामुद्दीन शेख (वय १८, रा. वैदुवाडी, इंदिरानगर, हडपसर) याने विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विश्रांतवाडी येथील मुख्य चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मंगळवारी (दि. १४) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गौरव, त्याचे मित्र रवी कोळी, शाहरुख शेख, रेहान हे दुचाकीवरून विश्रांतवाडी भागात आले होते. येरवड्यातील पंचशीलनगर परिसरात त्यांनी दुचाकी लावली होती. आरोपींशी गौरव याचा काही महिन्यांपूर्वी वाद झाला होता. वादातून आरोपींनी गौरवचा खून करण्याचा कट रचला होता. विश्रांतवाडीतील कार्यक्रम संपल्यानंतर मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास गौरव आणि त्याचे मित्र पंचशीलनगर परिसरात लावलेली दुचाकी घेण्यासाठी निघाले होते.

आरोपी गौरवच्या मागावर होते. येरवड्यातील कॉमर्स झोन आयटी कंपनीजवळील रस्त्यावर आरोपींनी गौरवला गाठले आणि त्याच्यावर कोयत्याने वार करण्यास सुरुवात केली. त्याच्याबरोबर असलेल्या मित्रांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. आरोपींनी त्यांना धमकावले. आरोपींनी केलेल्या हल्ल्यात गौरव गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारापूर्वीच तो मरण पावला होता. या घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखेचे उपायुक्त निखिल पिंगळे, परिमंडळ चारचे पोलिस उपायुक्त रजनीकांत चिलुमुला, तसेच वरिष्ठ पोलिस निरीक्षक मंगेश हांडे यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या आरोपींचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत असून, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संपतराव राऊत पुढील तपास करत आहेत.

**आधी गोळीबार,**
**मग कोयत्याने वार**

हल्लेखोरांनी सुरुवातीला गौरववर गोळीबार केला; मात्र गोळीचा नेम चुकला. त्यानंतर संतापलेल्या आरोपींनी धारदार कोयत्याने गौरववर वार केले. त्यानंतर आरोपींनी क्रूरतेचा कळस गाठत जवळच पडलेले दगड आणि विटांनी गौरवच्या डोक्यावर प्रहार केले. या अचानक झालेल्या घटनेमुळे परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.

## न्हाळ्यात घ्या त्वचेची खास काळजी ; नाहीतर वाढू शकतात त्वचारोग!

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वाघोली - प्रतिनिधी**
**स्वरुप गिरमकर**



**(पुणे) वाघोली :** उन्हाळ्यात त्वचेच्या अनेक तक्रारी वाढू लागतात. ठिकठिकाणी तापमानात बदल होत असल्यामुळे त्वचेच्या समस्या देखील वेगवेगळ्या दिसतात. पुण्यासारख्या शहरात दुपारी कडक ऊन आणि सकाळी गारवा असतो.हवेत आर्द्रता कमी असल्यामुळे त्वचा पटकन कोरडी पडते. त्यामुळे उन्हाळ्यात त्वचेची योग्य काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.कोरडी त्वचा असल्यास खाज येते. खाजवल्याने त्वचेवर जखमा होऊन जंतुसंसर्ग होऊ शकतो. केसही कोरडे व तुटणारे होतात. त्यामुळे त्वचेत ओलावा टिकवणे महत्त्वाचे आहे. शक्यतो कडक उन्हात जाणे टाळावे. आंघोळीला खूप गरम पाणी वापरू नये; कोमट पाणी योग्य असते. साबणाचा वापर मर्यादित प्रमाणात, फक्त घामाच्या भागांवर करावा. साबणाऐवजी शिकेकाई, डाळीचे पीठ किंवा स्क्रब वापरल्यास त्वचा अधिक कोरडी होऊ शकते, त्यामुळे ते टाळावे.

**उन्हाळ्यात कांजिण्या, गोवर, नागीण यांसारखे विषाणूजन्य आजारही वाढतात. वेळ न दवडता डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. घरगुती उपायांवर अवलंबून राहू नये. भरपूर पाणी पिणे, हलका आहार घेणे आणि विश्रांती घेणे आवश्यक आहे. योग्य काळजी घेतल्यास उन्हाळ्यातील त्वचेच्या समस्या टाळता येतात आणि हा ऋतू आनंदाने घालवता येतो.**

**– डॉ. पल्लवी मेहरे, वाघोली, पुणे.**

**टॅन घालवण्यासाठी वॅक्सिंग केल्याने त्वचेचा वरचा थर निघतो आणि त्वचा अधिक संवेदनशील बनते. त्यामुळे योग्य सनस्क्रीन वापरणे अधिक चांगले आहे. डॉक्टरांच्या सल्ल्याने सनस्क्रीन निवडावे. तळहाताएवढ्या भागासाठी एक रुपयाच्या नाण्याएवढे सनस्क्रीन पुरेसे असते. ते दर तीन–चार तासांनी पुन्हा लावावे.**

**– डॉ. कपिल जुमळे, वाघोली, पुणे.**

आंघोळीनंतर त्वचेवर मॉइश्चरायझर किंवा हलके तेल लावावे. त्यामुळे त्वचेत ओलावा टिकून राहतो आणि खाज कमी होते. वातानुकूलित कार्यालयात काम करणाऱ्यांची त्वचा अधिक कोरडी पडते. त्यांनी दर तीन–चार तासांनी मॉइश्चरायझर लावणे फायदेशीर ठरते.बाहेर काम करणाऱ्यांनी उन्हापासून संरक्षण करणे आवश्यक आहे. टोपी, रुमाल, पूर्ण बाह्यांचे सुती कपडे वापरावेत. उन्हाळ्यात सैलसर, फिकट रंगाचे कपडे घालावेत. घट्ट जीन्स किंवा लेगिंग्ज टाळाव्यात. असे कपडे घातल्यास घाम साचतो आणि गजकर्णासारखे बुरशीजन्य आजार वाढतात. सध्या गजकर्णाची साथ वाढलेली आहे. त्यामुळे त्वचा कोरडी ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

गजकर्ण झाल्यास स्वतःहून औषधे किंवा स्टिरॉइडयुक्त मलमे वापरू नयेत. त्यामुळे आजार बळावू शकतो. अशावेळी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. आपला टॉवेल, साबण आणि कपडे वेगळे ठेवावेत. कपडे रोज धुवून उन्हात वाळवून इस्त्री करून वापरावेत. मोजे रोज धुवावेत आणि बूट हवेशीर ठिकाणी ठेवावेत. मोबाईल, हेडफोन, हेल्मेट यांची स्वच्छता राखावी.उन्हाळ्यात सोरायसिस, इसब, आगवेल यांसारख्या त्वचारोगांची तीव्रता वाढू शकते. उन्हामुळे त्वचेवर टॅन येतो किंवा ॲलर्जी होते.

## बारामतीत वंजारवाडी जवळ सोमनाथ हॉटेलचे अमृता लॉजवर मध्यरात्री पोलिसांचा छापा

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**



**पुणे :** बारामती–भिगवण रोडवरील वंजारवाडीजवळील सोमनाथ हॉटेलमधील अमृता लॉजवर सुरू असलेल्या अवैध वेश्या व्यवसायावर बारामती तालुका पोलिसांनी मध्यरात्री छापा टाकला. या कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, पाच महिलांची सुटका करण्यात आली आहे. मंगळवारी (दि. १४) पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास पोलिसांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव आणि उपनिरीक्षक रामहरी भोसले यांच्या पथकाने बोगस ग्राहकाच्या मदतीने सापळा रचला. पंचांना सोबत घेऊन नियोजनपूर्वक अमृता लॉजवर धाड टाकण्यात आली. छापेमारीदरम्यान लॉजमधील विविध खोल्यांची तपासणी करण्यात आली असता काही ठिकाणी महिला आणि ग्राहक एकत्र आढळले. चौकशीदरम्यान, संबंधित आरोपी बाहेरून महिलांना आणून त्यांना ग्राहकांना पुरवत असल्याचे उघड झाले. ग्राहकांकडून पैसे वसूल करून त्यातून स्वतःचा आर्थिक फायदा मिळविण्यात आल्याचेही उघड झाले.

या प्रकरणात अजित जयसीन शेट्टी (वय ३८, हॉटेल चालक) आणि चाँद कलाम आलम (वय २०) यांना अटक करण्यात आली आहे. या घटनेत सापडलेल्या पश्चिम बंगाल येथील ३ व भिवंडी मुंबई येथील २ अशा ५ महिलांची सुटका करण्यात आली असून, त्यांना सुधारगृहात ठेवण्यात आले आहे. दोन्ही आरोपींनी संगनमत करून महिलांना पैशांचे आमिष दाखवून देहव्यवसाय चालविल्याचे निष्पन्न झाले आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी बोगस ग्राहकाला दिलेल्या नोटांसह रोख रक्कम, मोबाइल फोन, कंडोम पाकिटे तसेच ग्राहकांची नोंद असलेले रजिस्टर असा सुमारे १७,८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी बारामती तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कडजाई मातेच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**इंदोरी - प्रतिनिधी**



**इंदोरी :** तळेगाव चाकण रस्त्यांवर असलेले इंदोरी गावचे ग्रामदैवत आई कडजाई मातेचा उत्सव भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरणात मंगळवारपासून (दि. १४) सुरू झाला. पहाटेपासूनच गावात भक्तिरसाचा दरवळ पसरला होता. देहभान हरपून देवीच्या चरणी लीन होणे, अशी अनुभूती प्रत्येक भाविकाच्या चेहऱ्यावर दिसत होती. यंदाच्या उत्सवाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे ग्रामस्थांच्या वतीने एकत्रितपणे आरती व पूजा पार पडली. सकाळी पाच ते सात या वेळेत पारंपरिक पद्धतीने देवीची महाआरती करण्यात आली.

या उपक्रमामुळे गावात एकोपा आणि समरसतेचा संदेश देण्यात आला. सकाळी आठ वाजता शिवशक्ती भजनी मंडळाने सुमधुर भजन सादर करत वातावरण अधिकच भक्तिमय केले. टाळ–मृदंगाच्या निनादात आणि हरिनामाच्या गजरात उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले होते. त्यानंतर सकाळी नऊ वाजता देवीच्या पालखीची ग्रामप्रदक्षिणा मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत महिलांनी फुगड्या, तर युवकांनी ढोल–ताशांच्या गजरात सहभाग नोंदवला.

सायंकाळी चार वाजता नाथ सेवेकरी मंडळाचा गायनाचा कार्यक्रम रंगला. पारंपरिक आणि आध्यात्मिक गीते सादर करत त्यांनी भक्तीची साद घातली. यानंतर सायंकाळी सात वाजता भव्य दिव्य छबीना मिरवणूक गावातून काढण्यात आली.

या मिरवणुकीत रोषणाई आणि सजावट पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गदी केली होती. उत्सवाच्या निमित्ताने मंगळवार, गुरुवार आणि शुक्रवार या दिवशी ग्रामस्थांसाठी विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवासाठी उत्सव अध्यक्ष प्रज्वल शिंदे, उपाध्यक्ष आयुष शिंदे, मेघराज काशीद, सचिव कुणाल हिंगे, ऋषिकेश पानसरे, कार्याध्यक्ष रोहित दिवेकर, विराज काशीद, खजिनदार कुणाल चव्हाण, अथर्व भागवत आदींनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

## थेरगावच्या वैंभवात पडणार भर; सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून 'बटरफ्लाय गार्डन'च्या कामाची पाहणी

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**थेरगाव/पिंपरी - प्रतिनिधी**



**थेरगाव :** उद्याने ही शहराचे वैभव असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासोबतच शहराचे सौंदर्य वाढविण्याचे काम करत असतात. याच पार्श्वभूमीवर थेरगाव प्रभाग क्रमांक २३ येथे साकारण्यात येत असलेल्या निसर्गरम्य 'बटरफ्लाय गार्डन'च्या कामाची पिंपरी चिंचवड महापालिकेचे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज महापालिका अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर आढावा घेतला. गेल्या अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर आता या उद्यानाच्या कामाला मूर्त स्वरूप प्राप्त झाले असून सध्या हे काम प्रगतीपथावर आहे.

या पाहणी दौऱ्यादरम्यान सभापती अभिषेक बारणे यांनी नागरिकांसाठी हे उद्यान अधिक सुंदर, स्वच्छ आणि सुविधायुक्त व्हावे या दृष्टीने अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. यामध्ये प्रामुख्याने महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय करणे, उद्यानातील झाडांची संख्या वाढवणे आणि परिसरातील ड्रेनेज लाईनची पाहणी करून योग्य नियोजन लावण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची उत्तम व्यवस्था, मुख्य प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक, पार्किंग आणि नियमित स्वच्छतेसाठी ठोस व्यवस्थापन प्रणाली (मेंटेनन्स शेड्युल) तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. उद्यानामध्ये पक्षांना आकर्षित करणारी स्थानिक फुलझाडे आणि औषधी वनस्पतींची लागवड करण्यावरही त्यांनी भर दिला.

या प्रसंगी उद्यान अधीक्षक योगेश वाळुंज, सहाय्यक उद्यान अधीक्षक राजेश वसावे, उद्यान निरीक्षक सुनील नाळे, उद्यान सहाय्यक हनुमंत चाकणकर, उद्यान विभागाचे अरविंद कदम, उपअभियंता रमेश निवृत्ती जिंतीकर, कनिष्ठ अभियंता विकास दत्तात्रेय गोसावी यांच्यासह माजी स्वीकृत नगरसेवक संदीपजी गाडे व प्रभागातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. थेरगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणाऱ्या या उद्यानामुळे परिसरातील नागरिकांना लवकरच एक हक्काचे विरंगुळा केंद्र उपलब्ध होणार आहे.

**प्रतिक्रिया....**
**'थेरगावचे हे बटरफ्लाय गार्डन शहराच्या सौंदर्यात भर टाकणारे ठरेल. नागरिकांना एक स्वच्छ, सुंदर आणि सुविधायुक्त विरंगुळा केंद्र उपलब्ध करून देणे हे आमचे कर्तव्य आहे. उद्यानाचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याकडे आमचा कटाक्ष राहील.'**
**– अभिषेक बारणे**
**(सभापती, स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका)**

(पान १ वरून...)

### जगावर नव्या युद्धाचं सावट!

आला आहे. हे हल्ले प्रत्यक्षात कधी उतरणार, हे पुढे काय घडतं यावर अवलंबून असेल. युरोपीय मित्रांनो, निवांत झोपा!

रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने दावा केला आहे की, युक्रेनसाठी ड्रोनचं उत्पादन वाढवण्याचा युरोपिअन देशांचा निर्णय हे विचार करुन उचललेलं पाऊल आहे. यामुळे संपूर्ण युरोपीय खंडातील लष्करी–राजकीय परिस्थिती चिघळेल आणि हे देश हळूहळू युक्रेनचे धोरणात्मक 'रियर एरिया' ठरतील.

युक्रेनसाठी युरोपात तयार होणाऱ्या ड्रोनचा वापर करत रशियावर हल्ला केल्यास त्याचे अत्यंत गंभीर परिणाम होतील असा इशारा रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने दिला आहे. युरोपीय देशांची सुरक्षा बळकट करण्याऐवजी, युरोपीय नेत्यांच्या कृती या राष्ट्रांना रशियासोबतच्या युद्धाच्या दिशेने वेगाने ढकलत आहेत असंही रशियाने म्हटलं आहे.

### चर्चेनंतर इराणी नेत्यांना ठार मारण्याचा ...

कपटी आहे हे इराणला नेहमीच माहीत आहे. राजनैतिक स्तरावर वाटाघाटी करत असताना इराणी राजवट आपली लष्करी क्षमता मजबूत करत असल्याचेही त्यांनी सांगितले. या सगळ्या घडामोडींचा पुढील चर्चेच्या फेरीवर काय परिणाम होतो ते पाहावे लागणार आहे.

**चर्चेची पुढील फेरी लवकरच होणार**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही म्हटले आहे की, पुढील दोन दिवसांत पाकिस्तानात शांतता चर्चा पुन्हा सुरूहोऊ शकते. अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध संपवण्यासाठी चर्चा पुन्हा सुरूझाल्याचा दावा अनेक माध्यमांनी केला आहे. दोन्ही देशांचे वाटाघाटी करणारे संघ या आठवड्याच्या अखेरीस पाकिस्तानात परत येऊ शकतात. सूत्रांनुसार, इस्लामाबादला परत येऊन चर्चा पुन्हा सुरू करण्यासाठी वॉशिंग्टन आणि तेहरानला प्रस्ताव पाठवण्यात आले आहेत. तथापि, अद्याप कोणतीही विशिष्ट तारीख निश्चित करण्यात आलेली नाही.

# ११ केव्ही विद्युत लाईन प्रकरणी उपोषण मागे

## प्रशासनाच्या निवेदनानंतर तोडगा!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
संग्रामपूर - प्रतिनिधी
नंदकिशोर शिरसोले

**संग्रामपूर :** संग्रामपूर तालुक्यातील वरवट बकाल बस स्थानक परिसरातील ११ केव्ही विद्युत लाईन संदर्भात सुरू असलेले आमरण उपोषण अखेर मागे घेण्यात आले आहे. संबंधित प्रकरणात एमएसकेव्हीवाय सप्तम सौर एसपीव्ही लिमिटेडकडून दिलेल्या लेखी निवेदनानंतर हा निर्णय घेण्यात आला.

प्राप्त माहितीनुसार, मोमिनाबाद ते वरवट बकाल उपकेंद्रादरम्यान असलेल्या ११ केव्ही लाईनच्या सुरक्षित देखभाल आणि दुरुस्तीबाबत कंपनीने स्पष्ट भूमिका मांडली. गेल्या २५ वर्षांपासून या लाईनची देखभाल सर्व सुरक्षा मानके आणि अधिकृत कार्यपद्धतीनुसार केली जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.






या निवेदनात शटडाउन परवानगी, वैयक्तिक सुरक्षा उपकरणांचा (PPE) वापर, तसेच तांत्रिक देखरेख यांसारख्या सर्व आवश्यक उपाययोजना काटेकोरपणे राबविल्या जात असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच महावितरण (MSEDCL) च्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून विद्युत पुरवठ्याची सुरक्षितता आणि विश्वासार्हता राखण्यास कंपनी कटिबद्ध असल्याचेही सांगण्यात आले. सदर पत्र संग्रामपूर येथील वीज वितरण विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांमार्फत भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे तालुका अध्यक्ष देवराव शामराव सोळंके यांना सुपूर्द करण्यात आले. प्रशासनाच्या या भूमिकेनंतर उपोषणकर्त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आपले आमरण उपोषण तात्काळ मागे घेतले. या निर्णयामुळे परिसरातील तणाव कमी झाला असून नागरिकांनीही समाधान व्यक्त केले आहे. प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवादातून मार्ग निघाल्याने भविष्यात अशा समस्यांवर समन्वयाने तोडगा काढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.त्यावेळेस वरवट बकाल बस स्थानक वर आमरण उपोषण सोडवत असताना भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हा उपाध्यक्ष बाबुराव गुलाबराव नांदोकार, वरवट बकाल येथील पोलीस पाटील सिद्धधन इंगळे, सामाजिक कार्यकर्ते संतोष इगोकार, किशोर फाटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संजू भाऊ इंगळे, नामदेव ढगे, रवींद्र बकाल, प्रल्हाद चिमकर, प्रकाश इगोकार, देवानंद दमदार, बाळू भाऊ पाटकर, सुरज इंगळे, अंकुश इंगळे ,अर्जुन सोळंके, नंदू इंगळे, या सर्वांच्या उपस्थितीत तामगाव पोलीस स्टेशनचे कर्मचारी वरवट बकाल बीट अमलदार, बोरसे साहेब , यांच्या समक्ष वरवट बकाल विद्युत वितरण केंद्र चे हेमंत कांबळे साहेब यांनी लेखी पत्र देऊन उपोषण करते देवराव शामराव सोळंके भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे तालुका अध्यक्ष यांचे आमरण उपोषण सोडविले.

# ‘एप्रिलमध्येच उष्णतेचा तडाखा’

## बुलढाणा जिल्हा तापला, डोणगाव 40°C च्या उंबरठ्यावर!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
डोणगाव - प्रतिनिधी
सालार बेग

**डोणगाव :** एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाने बुलढाणा जिल्ह्यात जोरदार तडाखा दिला असून डोणगाव परिसरात तापमान झपाट्याने वाढत आहे. सध्या दुपारच्या वेळी तापमान ३९ ते ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले असून नागरिक उष्णतेमुळे त्रस्त झाले आहेत. अचानक वाढलेल्या उकाड्यामुळे दैनंदिन जीवनावरही परिणाम होताना दिसत आहे.



दुपारच्या सुमारास गावातील रस्ते ओस पडत असून, उष्ण वाऱ्यामुळे बाहेर पडणे कठीण झाले आहे. शेतकरी, मजूर आणि रोजंदारी करणाऱ्यांना या कडक उन्हाचा सर्वाधिक फटका बसत आहे. अंगावर येणाऱ्या गरम वाऱ्यामुळे काम करणे अवघड झाले असून नागरिक सावलीचा आसरा घेताना दिसत आहेत.

दरम्यान, थंड पेय, लिंबूपाणी, ताक यांची मागणी वाढली असून काही ठिकाणी पाण्याच्या वापरातही वाढ झाल्याचे चित्र आहे. आरोग्य विभागाने उष्माघाताचा धोका लक्षात घेता नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

‘दुपारी घराबाहेर पडणे कठीण झाले आहे, इतके ऊन कधीच जाणवले नव्हते,’ अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

प्रशासनाचा सल्ला : दुपारी १२ ते ४ या वेळेत बाहेर जाणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे, तसेच लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घ्यावी.

उन्हाचा चढता पारा पाहता, येत्या काही दिवसांत उष्णतेचा तडाखा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

# पांजरा गोंडी येथील घटना, शेतातील घर आगीत खाक; गावकऱ्यांचा प्रयत्न निष्फळ

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वर्धा - उपसंपादक
अवधूत शेंद्रे

**वर्धा :** कारंजा(घा)- तालुक्यातील पांजरा गोंडी येथे शेतकरी विजय साठे यांच्या गावानजीक असलेल्या शेतातील घराला लागलेल्या भीषण आगीत घरातील सर्व साहित्य जळून खाक झाले. या घटनेत त्यांचे शंभर टक्के नुकसान झाले असून गावात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

साठे यांच्या शेतात उभारलेल्या कच्च्या घराला दिनांक.१५ बुधवार ला दुपार च्या सुमारास अचानक आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले आणि घरातील सर्व साहित्य जळून खाक झाले. घरात साठवलेले धान्य, शेतीची अवजारे तसेच दैनंदिन वापरातील वस्तू पूर्णपणे नष्ट झाल्या.



घटनेची माहिती मिळताच गावातील नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. उपलब्ध साधनसामग्रीच्या मदतीने आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यात आला. मात्र, आग अत्यंत भीषण असल्यामुळे ती नियंत्रणात येईपर्यंत मोठे नुकसान झाले होते.

सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, शेतकरी विजय साठे यांच्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने पंचनामा केला आहे. यावेळी ग्राममहसूल अधिकारी आर.बी.शिराळे, मंडळ अधिकारी आर.पी.राठोड उपस्थित होते.आगीचे नेमके कारण शोधून योग्य ती कार्यवाही करावी, व नुकसान ग्रस्त शेतकऱ्याला आर्थिक मदत द्यावी.अशी गावकऱ्यांची मागणी आहे

# फुले-आंबेडकर जयंतीतून सामाजिक ऐक्याचा दीप प्रज्वलित

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
डोणगाव - प्रतिनिधी
सालार बेग

**डोणगाव :** क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त डोणगावातील वार्ड क्रमांक १, सिद्धार्थ नगर येथे रंगलेला पाच दिवसीय भव्य महोत्सव जल्लोष, उत्साह आणि सामाजिक बांधिलकीचा अनोखा संगम ठरला. ११ ते १५ एप्रिलदरम्यान पार पडलेल्या या महोत्सवाने संपूर्ण परिसर ‘जयभीम’च्या घोषणांनी दुमदुमून गेला आणि समता-बंधुत्वाचा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवला.

भीम जयंती उत्सव समिती २०२६ यांच्या पुढाकारातून आयोजित या सोहळ्यात विविध प्रबोधनपर, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांची आकर्षक मालिका अनुभवायला मिळाली. पहिल्याच दिवशी बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित गीतगायन व समाजप्रबोधन कार्यक्रमाने उपस्थितांना विचारप्रवृत्त करत वातावरण भारावून टाकले.



दुसऱ्या दिवशीची व्याख्यानमाला हा बौद्धिक मेजवानीचा पर्व ठरला. मान्यवर वक्त्यांनी समता, शिक्षण, संघटन आणि सामाजिक परिवर्तन यांवर प्रभावी मार्गदर्शन करत युवकांना नवसंजीवनी दिली. तिसऱ्या दिवशी आयोजित भव्य आरोग्य शिबिरात नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेत मोफत तपासणीचा लाभ घेतला. त्याचबरोबर महिलांसाठी घेण्यात आलेल्या रंगोळी, संगीत खुर्ची व लिंबू-चमचा स्पर्धांनी उत्सवात रंगत आणली.

१४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त काढण्यात आलेली भव्य मिरवणूक हा महोत्सवाचा कळस ठरला. ढोल-ताशांचा गजर, निळ्या झेंड्यांची पताका आणि ‘जयभीम’च्या गगनभेदी घोषणा यामुळे संपूर्ण डोणगाव उत्साहाच्या लाटेत न्हाऊन निघाले. हजारो नागरिकांच्या सहभागाने निघालेल्या या मिरवणुकीचे ठिकठिकाणी फुलांच्या वर्षावाने जल्लोषात स्वागत करण्यात आले.

महोत्सवाच्या अंतिम दिवशी अन्नदान (धम्मदान) कार्यक्रमाने या उत्सवाची समाधानकारक सांगता झाली. भाविकांना महाप्रसादाचे वाटप करून सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण घालून देण्यात आले.

या संपूर्ण महोत्सवाच्या यशासाठी समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मंडळ, युवक व ग्रामस्थांनी घेतलेले परिश्रम कौतुकास्पद ठरले. समता, बंधुता आणि विचारजागृतीचा दीप प्रज्वलित करणारा हा महोत्सव डोणगावच्या सामाजिक जीवनात एक प्रेरणादायी ठसा उमटवून गेला.

# महसूलकडून टिपर जप्त

## जालना आरटीओचे ‘अर्थपूर्ण’ दुर्लक्ष?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मंठा - प्रतिनिधी

**मंठा :** टाकळखोपा-इंचा मार्गावर गुरुवारी दुपारी सुमारे ३.४५ वाजता महसूल पथकाने विना नंबर वाहनातून विना रॉयल्टी वाळू वाहतूक करताना एक टिपर पकडला. या कारवाईत सुमारे २ ब्रास वाळू जप्त करण्यात आली. ही कारवाई महसूल पथकातील तलाठी नितीन चिंचोले व संदिप आदेलवाड यांनी तळणी येथील एका पोलीस कर्मचाऱ्याच्या मदतीने केली. संबंधित वाहन पुढील कारवाईसाठी मंठा येथे नेण्यात आले आहे. दरम्यान, चालकाच्या जबाबानंतर वाहनाचा क्रमांक एमएच २८ सीएफ ००६३ असल्याचे निष्पन्न




झाले असून, हे वाहन लोणार येथील विष्णू जायभाये यांच्या मालकीचे असल्याची माहिती पुढे आली आहे.

**आरटीओचे सोईस्कर दुर्लक्ष?**

पूर्णा नदीपात्रातील टाकळखोपा-किर्ला हद्दीत स्थानिक वाळू चोरट्यांकडून ट्रॅक्टरच्या सहाय्याने एका वडा खाली मोठ्या प्रमाणावर अवैध उत्खनन करून वाळूची विक्री सुरू असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, पुर्णा नदीकाठच्या बहुतांश वाहनांना नंबर नसल्याने महसूल विभागाच्या कारवाईत अडथळे निर्माण होत आहेत.

या संदर्भात जालना आरटीओकडे वारंवार तक्रारी करूनही अपेक्षित कारवाई होत नसल्याने सोईस्कर दुर्लक्ष होत असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. परिणामी, अवैध वाळू व्यवसायाला अप्रत्यक्ष पाठबळ मिळत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# नांदेड बिदर राष्ट्रीय राजमार्ग वर फुलवळ येथे टोल टॅक्स सुरू



दै.चालु वार्ता वृत्तसेवा
प्रतिनिधी - चंद्रकांत केंद्रे

**नांदेड :** तुम्ही चार चाकी गाडी घेऊन मुखेड किंवा जांब येथून कंधार ला जातात तर तुमच्या खिशाला कात्री लागेल. दिनांक:-१६/०४/२०२६ पासून भारतीय राष्ट्रीय राज मार्गावरील फुलवळ येथील टोल टॅक्स चालू झालेला आहे. खालील प्रकारे शुल्क आकारले जातील. वाहन प्रकार

कार जीप ६० रू, रिटर्न साठी ९० रू (२४ घंटे मध्ये)

टेम्पो मिनी बस साठी ९५ रू आणि १४५ रु (२४ घंटे मध्ये रिटर्न)

ट्रक बस साठी २०५ रु रिटर्न साठी ३०५ रु लागतील. राष्ट्रीय राजमार्ग एवढा मोठा टोल टॅक्स घेऊन पण तिथे ॲम्बुलन्स ची सुविधा नाही आणि टू व्हीलर साठी स्पेशल लाईन नाही या मुळे टू व्हीलर वाल्यांना खूप त्रास होतो याची NHAI दखल घेतली पाहिजे असं नागरिकांचे म्हणणं आहे.




# * प्रेरणादायी गोष्ट *

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

एका खेड्यात एक गरीब मुलगा राहत होता. त्याचं स्वप्न होतं शिकून मोठं होण्याचं. पण परिस्थिती इतकी कठीण होती की त्याला शाळेच्या फीकरता सुद्धा पैसे मिळत नव्हते. तरीही तो थांबला नाही. तो दिवसा शेतात मजुरी करायचा आणि रात्री दिव्याच्या प्रकाशात अभ्यास करायचा.

सर्वजण त्याला हसत, ‘या गरिबाला काय मोठं व्हायचंय?‘ पण त्याने त्यांची पर्वा केली नाही. मेहनतीवर विश्वास ठेवून तो पुढे गेला. काही वर्षांनी तोच मुलगा मोठा अधिकारी झाला. त्याच्या यशाने गावकऱ्यांना कळलं की गरीबी अडथळा नाही, खरी संपत्ती म्हणजे मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वास.

* शिकवण: अडचणी येतातच, पण त्या आपल्याला थांबवायला नव्हे तर पुढे नेण्यासाठी असतात.



## जाहिर सूचना

दिनांक : १७/०४/२०२६

नमस्कार,

दै चालु वार्ता कडून जाहीर करण्यात येथे की जर आमचा म्हणजेचं दै चालु वार्ताचा प्रतिनिधी आहे म्हणून कोणी दावा करत असेल तर त्याचं ID कार्ड पाहू शकता किंवा नियुक्ती लेटर सध्या जे आमचे पत्रकार आहेत त्याच्याकडे चालू कालावधीचे ID कार्ड किंवा नियुक्ती लेटर असतं तेंच आमचे पत्रकार आहेत. (कालावधी संपलेले ID किंवा नियुक्ती लेटर असेल आणि ते दै चालु वार्ताचा प्रतिनिधी असल्याचा दावा करत असतील तर ते खोटं आहे. तर आपण आमच्या कार्यालयात खालील नं वर संपर्क करू शकता.) जर कालावधीच्या आतील त्यांच्याकडे ID किंवा नियुक्ती लेटर नसेल तर ते सध्या आमचे म्हणजे दै चालु वार्ताचे अधिकृत पत्रकार नाहीत. जरी त्यांच्या पेपरला बातम्या लागत असतील तरीही ते अधीकृत नाहीत (बातम्या पत्रकारच्या नावानी त्यांनी केलेल्या विनंती मुळे लावल्या जातात.)

**टीप :** दै चालु वार्ताच नियुक्ती लेटर किंवा ID ओरिजिनल आहे कसं कळणार. ओरिजिनल ID व नियुक्तीलेटर वर युन्कि रेफरन्स नं आहे जों Ref पासून सुरु होतो.

कार्यालय : हंडेवाडी रोड, हडपसर पुणे - ४११०२८, मो ९३७३५०४७४८

This Daily Printed, Published and Owned by **Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** Printed at Girish Printers and Paper Converters, 150, Shaniwar Peth, Near Amruteshwar Mandir, Pune (M.S.)-411030 and Published at Flat No.806, 8 th Floor, Ratan Neptune, Handewadi Road, Hadapsar, Pune (M.S.)-411028 ■ **Editor : Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** ■ Mob No.: **9373504748** ■ Email **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (JURISDICTION AT PUNE)

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** यांनी गिरीष प्रिंटर्स अँड कन्व्हर्टर्स, १५०, शनिवार पेठ, अमृतेश्वर मंदिराजवळ, पुणे (महाराष्ट्र)- ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.८०६, ८ वा मजला, रतन नेपच्युन, हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे (महाराष्ट्र)-४११०२८ येथून प्रकाशित केले. ■ **संपादक - श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** ■ मो.नं.**9373504748** ■ Email - **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (सर्व वाद पुणे न्याय कक्षेत)




# आलेगाव येथील मंजूर विद्युत रोहित्र बसविण्यास महावितरणकडून दिरंगाई..

## वंचितचे उपसभापती यांची अभियंत्याकडे तक्रार

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पातुर - प्रतिनिधी
प्रदीप ताजने



**पातुर :** पातुर तालुक्यातील आलेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरातील विद्युत रोहित्र हे मंजुर झालेले असताना हे रोहित्र बसवून देण्यासाठी महावितरण कडुन दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत प्रलंबित असलेल्या रोहित्राचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी वंचित च्या कार्यकर्त्यांनी महावितरण कडे दिलेल्या निवेदनामध्ये केली आहे. विद्युत रोहित्र मंजूर झालेल्या परिसरामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र असुन खंडित पुरवठ्यामुळे आरोग्य केंद्रामध्ये अनेक समस्या निर्माण होत आहेत. येथील अनेक प्रकारच्या लसी ह्या खराब होत असुन आरोग्य केंद्रात असलेल्या रुग्णांची गैरसोय होत आहे.त्याचबरोबर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झालेल्या आणि गर्भवती महिला रुग्ण तसेच परिसरातील नागरिकांना खंडित पुरवठ्यामुळे अतिशय त्रास होत आहे.

मंजूर विद्युत रोहित्र परिसरामध्ये शाळा,विद्यालये,तसेच विविध मशीनरी वर चालणारी छोटेखानी कारखाने आहेत.त्यामुळे मंजूर असलेल्या विद्युत रोहित्राचे काम तातडीने पूर्ण करावे अशी मागणी वंचितचे उपसभापती ईमरान खान मुमताज खान आणि महिला अध्यक्षा अर्चना विष्णू डाबेराव यांनी महावितरण ला दिलेल्या निवेदनात केली आहे. 'मंजूर रोहित्राचे काम महावितरण कडुन प्रलंबित असुन यामुळे नागरिकांना अतिशय त्रास होत आहे.रोहित्राचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे'-मा.उपसभापती ईमरान खान मुमताज खान.

# स्टेट बँकेसमोर रस्त्यावर अतिक्रमण

## संभाजी ब्रिगेड आक्रमक, गुन्हा दाखल करण्याची मागणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
रिसोड - प्रतिनिधी
विजय जुंजारे

**रिसोड :** शहरातील वाशिम चौक परिसर, सेनगाव रोड येथे असलेल्या स्टेट बँक शाखेसमोर करण्यात आलेल्या रॅम्प व पायऱ्यांच्या कामावरून मोठा वाद निर्माण झाला असून, रस्त्यावर थेट अतिक्रमण केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष विनोद केशवराव पाचरणे यांनी संबंधित विभागांना कडक शब्दांत तक्रार सादर केली आहे.

पाचरणे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, बँकेत बदलीवर आलेले शाखा व्यवस्थापक प्रसाद व क्षेत्रीय व्यवस्थापक आशिष सिंग यांनी ग्राहक हित डावलून संगनमताने नियमबाह्य कामे केल्याचा ठोस आरोप करण्यात आला आहे. शाखा दुरुस्तीच्या नावाखाली करण्यात आलेल्या बदलांमध्ये अपंगांसाठी उभारलेला रॅम्प व पायऱ्या थेट रस्त्यावर येत असून, सार्वजनिक मार्गावर अतिक्रमण झाले आहे, असे त्यांनी नमूद केले आहे. तसेच, या कामासाठी स्थानिक परवानगी, तांत्रिक मंजुरी, मंजूर अंदाजपत्रक व खर्च मंजुरी घेतली गेली का? याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. बँकेसमोर योग्य पार्किंग व्यवस्था नसल्याने



रस्त्यावर वाहनांची गर्दी होत असून, त्यामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत असल्याची तक्रारही करण्यात आली आहे.

या प्रकरणात संबंधित अधिकारी व बँक प्रशासनावर फौजदारी गुन्हा नोंद करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच अतिक्रमण तात्काळ हटवून रॅम्प नियमांनुसार पुन्हा बांधण्याचे आदेश द्यावेत, अशीही भूमिका घेण्यात आली आहे.

दरम्यान प्रशासनाने तक्रारीची दखल न घेतल्यास, संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा स्पष्ट इशारा पाचरणे यांनी दिला आहे. या आंदोलनातून उद्भवणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील, असेही त्यांनी नमूद केले आहे. दरम्यान, या प्रकरणी नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग,पोलीस प्रशासन तसेच बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार पाठवण्यात आली असून, प्रशासन आता कोणती कारवाई करते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अक्षय तृतीयेला उपनयन संस्कार शिबिर व १०८ वर्षपूर्तीनिमित्त भव्य कार्यक्रम; जैन समाजात उत्साह

## वाशिम जैन चौक चिंतामणी पार्श्वनाथ अतिशय क्षेत्र येथे प.पू संकल्पसागर महाराजांच्या सानिध्यात १९ एप्रिल २०२६ रोजी पत्रिका अनावरण व संस्कार कार्यक्रमाचे कारंजा गुरुकुल येथे ऐतिहासिक आयोजन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मालेगाव - प्रतिनिधी
लकी रोकडे जैन



**वाशिम :** वाशिम येथील जैन चौक परिसरातील श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ भगवान मंदिर अतिशय क्षेत्र येथे पट्टाचार्य १०८ श्री विशुद्ध सागरजी महाराजांचे प्रभावक शिष्य परम पूज्य १०८ संकल्पसागरजी महाराज यांच्या सानिध्यात नित्य प्रवचन सुरू असून भक्तांना गुरु अमृत वाणीचा लाभ मिळत आहे. याच प्रवचनामध्ये संकल्पसागरजी महाराजांनी 'जैन धर्म कोणाचा आहे? तर जो जैन धर्माचे पालन करतो, तोच जैन धर्माचा आहे,' असा संदेश दिला. या विचाराने उपस्थित भाविकांमध्ये प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

प्रवचनानंतर सभागृहात उपनयन संस्कार शिबिर पत्रिकेचे अनावरण करण्यात आले. हा कार्यक्रम श्री दिगंबर जैन महासमिती विदर्भ उपाध्यक्ष गुरुभक्त प्रशांत गडेकर आणि वाशिम जिल्हा अध्यक्ष गुरुभक्त प्रमोद मानेकर यांच्या हस्ते पार पडला. यावेळी विविध समाजबांधवांनी उपस्थित राहून गुरुदेवांचे आशीर्वाद घेतले. तसेच या प्रसंगी वाशिम मंदिरचे सचिव जोगी, कोषाध्यक्ष धीरज लवंडे सह बहुसंख्य जैन समाज बांधव उपस्थित होते. दिनांक १९ एप्रिल २०२६ ला अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर कारंजा (लाड) गुरुकुल येथे उपनयन संस्कार विधीचे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात परम पूज्य १०८ पट्टाचार्य विशुद्ध सागरजी महाराजांचे प्रभावक शिष्य श्रमण १०८ श्री सुप्रभसागरजी महाराज ससंघ यांच्या सानिध्यात बालकांवर उपनयन संस्कार केले जाणार आहेत.

या उपक्रमासाठी वाशिम जिल्ह्यातील ८ वर्षांवरील युवकांची नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नोंदणीसाठी संपर्क राजाभाऊ डोणगांवकर, सुहास चवरे, मंगेश काळे, मंगेश फुरसुले, प्रमोद मानेकर (वाशिम), संजय उखळकर (रिसोड), विनोद रोकडे (मालेगाव) यांच्याशी संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

कार्यक्रमात कारंजा गुरुकुलच्या १०८ वर्षपूर्तीनिमित्त गुरुकुल प्रणेते प.पू गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराजजी यांच्या पुतळ्याचे अनावरणही अक्षय तृतीयेला करण्यात येणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नवीन बिना येथे आंबेडकर जयंती महोत्सवाची दमदार सुरुवात

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नागपूर - प्रतिनिधी
जयंत चौव्हान



**नागपूर :** नवीन बिना येथील बौद्ध विहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती महोत्सवाचा शुभारंभ उत्साहात व जल्लोषात पार पडला. भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ तसेच राहुल नवयुवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधत महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. यादरम्यान अशोक मेश्राम, वंदना मेश्राम आणि किशोर चव्हाण यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

सायंकाळी आयोजित उद्घाटन सोहळ्यात गौतम बुद्ध, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई यांच्या प्रतिमा व पुतळ्यांना माल्यार्पण करून बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कंत्राटदार संघटनेचे दिलीप बनसोड होते. प्रमुख अतिथी म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रविंद्र चिखले, सरपंच मिनाक्षी तागडे तसेच अभियंता धिरज बनसोड उपस्थित होते.प्रास्ताविकात डॉ. जितेंद्र तागडे यांनी महोत्सवाचा उद्देश स्पष्ट करत शिक्षण व समतेच्या विचारांचा प्रसार करण्याचे आवाहन केले. मान्यवरांनी आपल्या भाषणातून फुले-शाहू-आंबेडकर विचारांची सामाजिक गरज अधोरेखित केली. सांस्कृतिक कार्यक्रमात अवेरा गुपच्या स्वागतगीत व नृत्याने रंगत आणली, तर साजिता हिने बुद्धांची भूमिका साकारत उपस्थितांची दाद मिळवली. मिना ढोके यांच्या गीताने आणि भिम गर्जना समूह नृत्याने वातावरण भारावून गेले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व संघटनांच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कल्पना वासनिक व प्रिती गोलाईत यांनी केले, तर आभार प्रदर्शन रोहिणी धनवटे व विशाखा ढोके यांनी मानले.

# दिगंबर जैन साधूंचे कठोर तपस्वी जीवन – उष्णतेतही संयम, त्याग आणि आत्मशिस्तीचे अद्वितीय दर्शन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मालेगाव - प्रतिनिधी
लकी रोकडे जैन



**४०-४२ अंश तापमानात अनवाणी पायी विहार, दिवसातून एकदाच आहार-पाणी ग्रहण आणि सर्व भौतिक सुखसुविधांचा पूर्ण त्याग करून साधू जीवनातील कठोर नियमांचे पालन**

**मालेगाव :** दिगंबर जैन परंपरेतील साधूंचे जीवन हे अत्यंत कठोर, संयमी आणि तपश्चर्येने परिपूर्ण मानले जाते. सांसारिक सुख-सुविधांचा पूर्णपणे त्याग करून आत्मशुद्धी, अहिंसा आणि मोक्षमार्ग साध्य करणे हे त्यांच्या जीवनाचे प्रमुख ध्येय असते.

उन्हाळ्यातील ४० ते ४२ अंश सेल्सिअसच्या तीव्र तापमानातही हे साधू अनवाणी पायांनी डांबरी रस्त्यावरून दररोज साधारण २० ते २५ किलोमीटरपर्यंत विहार करतात. त्यांच्या जीवनशैलीत कोणत्याही प्रकारची आरामदायी साधने स्वीकारली जात नाहीत.

दिगंबर जैन साधूंच्या आचारसंहितेनुसार ते दिवसातून फक्त एकदाच उभे राहून आहार ग्रहण करतात. त्याच वेळी पाणीही घेतले जाते आणि त्यानंतर दिवसभर पाणी किंवा अन्न ग्रहण करण्याचे टाळले जाते. या नियमांचे पालन अत्यंत शिस्तबद्ध आणि कठोरतेने केले जाते.

या साधूंच्या जीवनात एसी, पंखा, कुलर, अंघोळ, पलंग, गादी, चादर किंवा उशी यांसारख्या कोणत्याही भौतिक सुखसुविधांना स्थान नसते. साधे भूमीवर बसणे आणि विश्रांती घेणे हीच त्यांची दिनचर्या असते.

या कठोर तपश्चर्येमुळे शरीरावर मोठ्या प्रमाणात शारीरिक ताण येतो. विशेषतः अनवाणी पायी विहारामुळे पायांच्या तळव्यांवर कठीण त्वचा निर्माण होते, तरीही साधू आपल्या साधनेत कोणतीही तडजोड करत नाहीत.

जैन धर्मातील या परंपरेला अत्यंत पवित्र आणि आत्मकल्याणाचा मार्ग मानले जाते. संयम, अहिंसा आणि आत्मनियंत्रण या तत्त्वांवर आधारित हे जीवन समाजासाठी प्रेरणादायी मानले जाते. भक्तगण या साधूंच्या दर्शनासाठी मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहतात आणि त्यांच्या आशीर्वादाला अत्यंत महत्त्व दिले जाते. त्यांच्या जीवनातील त्याग आणि साधना ही अध्यात्मिक उंचीचे प्रतीक मानली जाते.

# 'सातबारा बंद: सत्य लपवण्याचा प्रयत्न?'

## आमदारांच्या १०० कोटी कर्ज प्रकरणावर संताप उसळला!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
रिसोड - प्रतिनिधी
विजय जुंजारे

**रिसोड :** महाराष्ट्रात सध्या जमीन व्यवहार आणि कर्जप्रकरणांभोवती मोठं वादळ उठताना दिसत आहे. सामाजिक कार्यकर्ते रविराज साबळे यांनी ज्या-ज्या सातबाऱ्यांचा उल्लेख केला, ते सातबारा उतारे अचानक बंद होऊ लागल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. हा केवळ तांत्रिक बिघाड आहे की जाणीवपूर्वक माहिती लपवण्याचा प्रकार, असा गंभीर सवाल आता जनतेतून विचारला जात आहे.

याच पार्श्वभूमीवर एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे, एका आमदाराने अवघ्या १५ एकर जमिनीवर तब्बल १०० कोटी रुपयांचे कर्ज उचलल्याचा आरोप होत आहे. सोशल मीडियावर हे प्रकरण प्रचंड गाजत असून, सामान्य शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारे असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

एकीकडे छोटा शेतकरी काही लाखांच्या कर्जासाठी बँकेच्या दारात हेलपाटे मारतो, कागदपत्रांची पूर्तता करताना हैराण होतो, तर दुसरीकडे मोठ्या लोकांना कोट्यवधींचे कर्ज सहज कसे मिळते?

१५ एकरावर १०० कोटी मिळतात, पण २-३ एकर धारक शेतकऱ्याला का नाकारले जाते?

याहून गंभीर बाब म्हणजे, हेच आमदार आणि काही मंत्री शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर अटी घालताना दिसतात. 'ज्यांच्याकडे गाडी आहे, बंगला आहे, इन्कम टॅक्स रिटर्न आहे, त्यांना कर्जमाफी नाही' असे नियम लावले जातात. मग प्रश्न असा - हे नियम फक्त शेतकऱ्यांसाठीच का? सत्ताधाऱ्यांसाठी वेगळे नियम आहेत का?

**जनतेचा संताप :**

'सामान्य माणसासाठी वेगळं न्याय आणि सत्ताधाऱ्यांसाठी वेगळं कायदा - ही कोणती लोकशाही?' असा संतप्त सवाल आता रस्त्यावरून ते सोशल मीडियावर घुमतोय.

**मुख्य मुद्दे:**

✻ सातबारा उतारे अचानक बंद - पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

✻ १५ एकर जमिनीवर १०० कोटी कर्ज - मोठा घोटाळा?

शेतकऱ्यांसाठी कठोर अटी, नेत्यांसाठी मोकळं रान

प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात

**जनतेची मागणी:**

या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, संबंधित सातबारा पुन्हा सुरूकरून सत्य जनतेसमोर आणावे आणि दोषींवर कठोर कारवाई करावी.

'शेतकरी रडतोय: आणि सत्ताधारी कर्जात पोहतायत!' ही परिस्थिती बदलणार का?

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

## शिवसेना नेते अशोकभाऊ झिंगरे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नागपूर - प्रतिनिधी
जयंत चौव्हान



**नागपूर :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आज परिसरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ठिकठिकाणी भीमरायांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या मंगल दिनाचे औचित्य साधत शिवसेना नेते अशोकभाऊ झिंगरे यांचा वाढदिवसही कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. सकाळी भीम जयंतीनिमित्त विविध मंडळांच्या वतीने मिरवणुका आणि सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 'जय भीम'च्या घोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. याच उत्साहात शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येत अशोकभाऊ झिंगरे यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना कार्यकर्त्यांनी सांगितले की, 'अशोकभाऊंच्या रूपाने सामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेले नेतृत्व आम्हाला लाभले आहे.' या कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, शिवसैनिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंपळगाव येथील उपोषणाची लेखी आश्वासनाने सांगता..

## ग्रामपंचायतच्या मनमानी कारभाराच्या चौकशीची मागणी..

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
जळगाव जामोद प्रतिनिधी
विनोद वानखडे

**जळगाव जामोद :** जळगाव जामोद तालुक्यातील पिंपळगाव काळे ग्रामपंचायतचा मनमानी कारभार चव्हाट्यावर आणण्यासाठी भाजपा दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष वासुदेवराव काकडे आणि ग्राम अध्यक्ष राम बेंदरकर यांच्या सह सुमारे २१ कार्यकर्त्यांनी १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता पासून आमरण उपोषण सुरूकेले होते... दरम्यान काही तासात ग्रामपंचायत प्रशासनाने ५ वर्षाचा दिव्यांग निधी उपलब्ध करून येत्या ३१ मे पर्यंत सर्वांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार असल्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर सदर उपोषण तूर्तास मागे घेण्यात आले आहे......

याप्रसंगी बुलढाणा जिल्हा परिषदेचे विरोधी पक्षनेते बंडूभाऊ पाटील आणि भाजपा तालुका अध्यक्ष संजय पांडव यांच्या सहकार्याने आणि दिव्यांग भाजपा जिल्हाध्यक्ष अध्यक्ष अंबादास निंबाळकर, सरचिटणीस चंदू शिंदे यांच्या विशेष प्रयत्नाने तसेच ग्रामसेवक मडके यांच्या लेखी पत्राने सदर उपोषण सोडण्यात आले... यावेळी मधुकर राऊत, वैभव वडोदे, रवींद्र बोदडे, विनोद बहादरे, सुनील वडोदे, गजानन बेलोकर तसेच संघटनेचे अनेक कार्यकर्ते आणि ग्रामवासी हजर होते..



# श्री शिवाजी विधी महाविद्यालयात महामानवाला अभिवादन

## श्री शिवाजी विधी महाविद्यालयात ग्रंथोत्सव साजरा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**परभणी - प्रतिनिधी**
**रूद्र तळणकर**



**परभणी :** म.शि.प्र.मंडळ संचलित श्री शिवाजी विधी महाविद्यालय परभणी येथे मंगळवार १४ एप्रिल २०२६ रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एल.धर्मापुरीकर यांनी महामानवांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मानवंदना दिली. पुढे त्यांनी आपल्या मनोगतात शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा बाबासाहेबांचा मंत्र आजच्या तरुणाईने आत्मसात करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असे सांगून समता, बंधुता आणि न्यायाचा विचार देणाऱ्या महामानवाचे कार्य जगासाठी प्रेरणादायी आहे अशी भावना यावेळी व्यक्त करून उपस्थितांना जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील ग्रंथालय आणि माहिती केंद्र विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित व त्यांच्यावर आधारित असलेल्या ग्रंथसंपदेचे यावेळी प्रदर्शन भरवण्यात आले होते. सदरील प्रदर्शनाचे प्राचार्य डॉ. एम.एल. धर्मापुरीकर यांनी फीत कापून उद्घाटन केले त्यांनी आपल्या उद्घाटन पर भाषणात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि ग्रंथालय यांचे नाते अतूट आणि प्रेरणादायी आहे 'वाचाल तर वाचाल' हा संदेश देणाऱ्या बाबासाहेबांचे संपूर्ण आयुष्य ग्रंथांच्या सहवासात गेले. तसेच समाजातील शेवटच्या घटकांनी ग्रंथालयाकडे वळले पाहिजे जेणेकरून वैचारिक क्रांती घडवून येईल असे सांगितले. तर ग्रंथपाल डॉ. सचिन व्ही. कदम यांनी हा ग्रंथोत्सव साजरी करण्यामागची भूमिका व महत्त्व यावर भाष्य केले तसेच त्यांनी डॉ. बाबासाहेबांची ग्रंथालयातील शिस्त आणि पुस्तकावरील प्रेम यामुळेच ते जगातील सर्वात विद्वान व्यक्ती पैकी एक बनले आणि त्यांच्यासाठी ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे कपाट नव्हते तर प्रज्ञेचे मंदिर होते असे सांगितले. तसेच या दिवसाचे औचित्य साधून ग्रंथालय आणि माहिती केंद्र विभागाच्या वतीने सलग १८ तास अभ्यास (सकाळी ०६:०० ते मध्यरात्री १२ पर्यंत) या उपक्रमाचे आयोजन केले गेलेले होते. सदरील उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी रा.से.यो. विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.राजेश.बी. देशमुख, ग्रंथपाल डॉ.सचिन व्हि. कदम, ग्रंथालय परिचर किशन होनराव आदींनी परिश्रम घेतले यांना करण पाईकराव, सतीश अनवते, रमेश वाकळे, प्रदीप हणवते, सुरज भोरगे, निहाल महाजन, करण धोत्रे, गोविंद चाफाकानडे आदींचे मोलाचे सहकार्य लाभले. वरील विविध उपक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश दादा सोळंके, सचिव आ.सतीश भाऊ चव्हाण तसेच महाविद्यालय विकास समितीचे सन्माननीय सदस्य चंद्रशेखर नखाते, गोविंद कदम, मगदूम मोहीउद्दीन, संतोष बोबडे, ॲड. दीपक देशमुख, ॲड. अशोक शिंदे, संतोष इंगळे आदींनी जयंती निमित्त शुभेच्छा देऊन सदरील स्तुत्य उपक्रमांचे स्वागत केले.

# माणूस म्हणून जगण्याची संधी संविधानामुळे मिळाली– प्रा.डॉ. दीपक सूर्यवंशी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**धाराशिव - प्रतिनिधी**
**समीर मुल्ला**



**धाराशिव :** शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने घटनेचे शिल्पकार व बहुजनांचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी झाली. या जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयात मराठी विभागाचे प्रा. डॉ.दीपक सूर्यवंशी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा चे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत भगवान यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता ही तत्वे आपल्याला संविधानामुळे मिळाली असे प्रतिपादन प्रा.डॉ.सूर्यवंशी यांनी केले. ते पुढे म्हणाले, व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार, मानवाचे प्रतिष्ठा व सामाजिक न्याय ही त्यांची कार्यप्रणाली होती. शिका, संघटित व्हा व अन्यायाविरुद्ध संघर्ष करा असा संदेश त्यांनी बहुजन समाजाला दिला. समाजातील दलितांना, वंचितांना व स्त्रियांना शिक्षणाची समान संधी संविधानाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली व त्यांना सामाजिक न्याय मिळवून दिला. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो ते पिईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असे बाबासाहेबांनी ठणकावून सांगितले. या कार्यक्रमासाठी ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळाचे संचालक प्रा. डॉ.संजय कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच या कार्यक्रमासाठी प्रा.डॉ.पावडे, प्रा.डॉ.महाजन, प्रा. डॉ.श्रीकांत भोसले, प्रा. डॉ.समाधान चंदनशिवे, प्रा. माने, प्रा. शेळके, प्रा.गणेश पाटील, प्रा. शाहरुख शेख, प्रा.जमाले, तसेच कार्यालयीन कर्मचारी संतोष मोरे, अरुण मुंडे, विनोद खरात, शेळके, बंडगर ,गावडे, तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. ताटीपामुल, प्रा. डॉ. हेमंत चांदोरे हे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी बहुसंख्य विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होत्या. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्रबंधक हनुमंत जाधव व सहाय्यक ग्रंथपाल अरविंद शिंदे यांचे सहकार्य लाभले.

# खरोसा येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमीत्त शालेय साहित्य व फळे वाटप

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**औसा - प्रतिनिधी**
**जिवन जाधव**




**औसा :** खरोसा जिल्हा परीषद शाळेत महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेच पुजन करुन कार्यक्रमाला सुरुवात. औसा तालुक्यातील खरोसा येथील जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक शाळेत खरोसा गावचे सुपुत्र नेताभाऊ मित्र मंडळाच्या वतिने शाळेतील पहीली ते चौथी वर्गातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फळांचे वाटप करण्यात आले असुन, खरोसा येथील नेताभाऊ मित्र मंडळाच्या वतिने अनेक लोकोपयोगी व लोकहिताचे अनेक कार्यक्रम राबवले जातात.

आज खरोसा येथील जिल्हा परीषद शाळेतील पहीली ते चौथी वर्गातील हुशार व गरजु विद्यार्थ्यांना महामानव संविधानाचे जनक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमीत्त शालेय साहित्य व फळांच वाटप करण्यात आले. यावेळी शालेय व्यवस्थापण समिती उपाध्यक्ष नेताजी शहाजी कांबळे, विवीध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन आमोल सांडुर, ग्रामपंचायत सदस्य शरद दत्ताज्य कांबळे, मुख्याध्यापक देशमुख सर, उबाळे सर, होगले सर, अनंतवाड सर ,घोडगे मॅडम, शिरुरे मॅडम, येरोळे सर, सुबेदार मॅडम,सुरज कांबळे, एकनाथ कांबळे लखन अवचारे, दीपक श्रंगारे सागर कांबळे, अक्षय कांबळे आनंद कांबळे, मुक्तेश्वर कांबळे दीपक मुसांडे ,महादेव काळे, बंडू कांबळे,तेजस कांबळे ,सह खरोसा ग्रामस्थ उपस्थीत होते ,

# जि. प. प्रा. शाळा नानू नाईक तांडा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त 'ज्ञान महोत्सव' उत्साह साजरा...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**उमरी - प्रतिनिधी**
**श्रीनिवास मुक्कावार**



**उमरी :** उमरी तालुक्यात जि. प. प्रा. शाळा नानुनाईक तांडा येथे दि. १४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ज्ञान महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे समता दूत श्रीमती गायकवाड यांनी अत्यंत सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व समजावून सांगितले. संविधानाने आपल्याला दिलेले मूलभूत अधिकार, आपली कर्तव्ये आणि मार्गदर्शक तत्त्वे कशी जगायला शिकवतात, याचे त्यांनी सुंदर मार्गदर्शन केले. त्यानंतर, अशोक हैबतकर यांनी आपल्या अमोघ वाणीतून महासूर्य तू' या कवितेच्या माध्यमातून आपली अभिव्यक्ती सादर केली; त्यांच्या शब्दांतील ऊर्जा उपस्थितांच्या अंगावर काटा आणणारी होती. पगारे मॅडम यांनी अत्यंत समर्पक उदाहरणे देत विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाचे महत्त्व आणि वाचनाची गोडी कशी निर्माण करावी, यावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचा सर्वात भावनिक आणि अंगावर शहारे आणणारा प्रसंग म्हणजे याच नानू नाईक तांडा गावचे भूमिपुत्र डॉ. राजपाल जाधव यांचे मनोगत. आज बीड जिल्ह्यात प्राध्यापक म्हणून यशस्वीपणे कार्यरत असलेल्या डॉ. जाधव सरांनी आपल्या लहानपणीच्या आठवणींना उजाळा दिला. 'पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग, ती एकच पडकी खोली आणि आम्हाला शिकवणारे ते एकच शिक्षक...' हा त्यांचा संघर्षमय प्रवास ऐकताना अनेकांचे डोळे पाणावले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उच्च शिक्षणाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी जिद्दीने शिक्षण घेत थेट 'पीएचडी' (PhD) पर्यंत मारलेली मजल आजच्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी एक जिवंत प्रेरणा ठरली. परिस्थिती कितीही बिकट असली तरी शिक्षणाच्या जोरावर आभाळ कवेत घेता येते, हाच संदेश त्यांच्या प्रवासातून मिळाला.

या विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी राम गायकवाड यांनी सर्वांना बक्षीस स्वरूपात 'पेन' भेट दिले, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद द्विगुणित झाला. या प्रेरणादायी आणि अविस्मरणीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक दिगांबर नागलवाड यांनी भूषवले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल जाधव, गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आनंदी शिक्षणाचा गुरूमंत्र 'मुस्कूराता बचपन' – डॉ.आशिष अग्रवाल

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**देगलूर - प्रतिनिधी**



**देगलूर :** देगलूर येथील सप्तगिरी पोदार लर्न स्कूल या विद्यालयाने श्री सदगुरू बंडयप्पा स्वामी मठ येथील सभागृहामध्ये प्रसिध्द बालरोग तज्ञ डॉ. आशिष अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षण केवळ पाठांतरापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणे गरजेचे ठरत आहे. यासाठी 'आनंदी शिक्षणाचा गुरूमंत्र 'मुस्कूराता बचपण'' ही संकल्पना शिक्षण क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. कार्यक्रमाच्या सुरूवातीस शाळेचे संचालक डॉ. कपील एकलारे यांनी प्रमुख व्याख्याते डॉ आशिष अग्रवाल यांचे पुष्पगुच्छ व भेट वस्तू देऊन स्वागत केले. आपल्या सखोल अशा मार्गदर्शनातून पालकांना व उपस्थित विद्यर्थ्यांना आनंदी शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांना भीतीमुक्त, उत्साही आणि सर्जनशील वातावरणात शिकण्याची संधी देणे होय. पारंपरिक शिक्षणपद्धतीत शिक्षक केंद्रस्थानी असतो, मात्र आनंदी शिक्षणात विद्यार्थी हा केंद्रबिंदू ठरतो. खेळ, प्रयोग, गोष्टी, गाणी आणि उपक्रम यांच्या माध्यमातून शिक्षण अधिक रुचकर बनवले जाते असे म्हटले आहे. त्याच बरोबर शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी मैत्रीपूर्ण नाते निर्माण करून त्यांच्यात आत्मविश्वास वाढवणे, त्यांच्या प्रश्नांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या कल्पनांना वाव देणे हा या पद्धतीचा मुख्य गुरुमंत्र आहे. यामुळे विद्यार्थी केवळ अभ्यासातच नव्हे तर सामाजिक, भावनिक आणि बौद्धिक दृष्ट्याही सक्षम बनतात याचबरोबर शिक्षकांनी विद्यार्थ्याला शिक्षा केल्यास विद्यार्थ्यांचे समर्थन न करता शिक्षकांची चूक न मानता विद्यार्थ्यांना समज दिली पाहिजे असे सुचवले. शाळांमध्ये विविध उपक्रम जसे की प्रकल्पाधारित शिक्षण, गटचर्चा, कला व क्रीडा यांचा समावेश करून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवला पाहिजे यामुळे शिक्षण अधिक प्रभावी आणि टिकाऊ बनते असे मत त्यांनी व्यक्त केले. एकूणच, 'आनंदी शिक्षणाचा गुरूमंत्र' हा विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक सकारात्मक आणि आवश्यक पाऊल ठरत आहे. या कार्यक्रमासाठी शाळेचे प्राचार्य डॉ. अभिनव शुक्ला, जंम्बो कीडस् च्या मुख्याध्यापिका सौ. रिंपल रत्ती व शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले व कार्यक्रमासाठी विद्यार्थी व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानिक आधीकारामुळे आज महिलांची प्रगती झाली – सहाय्यक पोलीस निरीक्षक सीमा बोईने

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**नांदेड - प्रतिनिधी**
**शिलरतन लोखंडे**



**नांदेड :** भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी पवित्र असे संविधान या देशाला देऊन सर्वांना शिक्षणासह समानतेचा अधिकार देऊन महिलांना स्वतंत्र अधिकार दिल्यामुळे आज देशातील महिलांची प्रगती झाली असून महिला राष्ट्रपती पंतप्रधान सह विविध पदावर काम करत असल्याचे मत वजीराबाद पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक सीमा बोईने यांनी शहरातील उपसरपंचनगर स्वप्नजा गार्डन येथे आयोजित केलेल्या महात्मा ज्योतिराव फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या संयुक्त जयंतीनिमित्त मार्गदर्शन करताना केले. यावेळी व्यासपीठावर माजी शिक्षण संचालक नंदन नागरे. सेवानिवृत्त प्राध्यापक विनायक लोणे सेवा निवृत्त पोलीस निरीक्षक प्रभाकर गिरी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक संभाजी वाठोरे सेवानिवृत्त मुख्यध्यापक सुभाष सवई .शिक्षण विस्तार अधिकारी तथा जयंती मंडळाचे अध्यक्ष प्रदीप भगत. पत्रकार गंगाधर गच्चे. मी सावित्रीबाई फुले बोलते या एक पात्री प्रयोगाच्या सादर कर्त्या शैलजा विनायकराव लोणे आदिची उपस्थिती होती.

पुढे बोलताना सीमा बोईने म्हणाल्या की या देशात पवित्र असं संविधान असून देश संविधानावर चालतो त्या संविधानामध्ये महिलांना भरपूर अधिकार दिल्यामुळे महिलांची उन्नती झाली आहे. शिक्षणाचा अधिकार दिल्यामुळे आज महिला देशाच्या राष्ट्रपती पंतप्रधान व विविध पदावर विराजमान झाल्या आहेत.

माता सावित्रीबाई फुलेंनी शिक्षणाची पहिली शाळा पुण्यामध्ये काढून मुलींना शिक्षणाची दारे खुले केले व बाबासाहेबांनी महिलांना संविधानात अधिकार दिले त्यामुळे महिला या आज विविध क्षेत्रामध्ये प्रगतीपथावर स्वतंत्र जबाबदारी सांभाळत आहेत म्हणून महिलांनी बाबासाहेबांच्या विचारांचे आचरण करावे असे मत त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले.

सर्वप्रथम महापुरुषांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर मी सावित्री बोलते शैलजाताई लोणे यांनी एक पात्री प्रयोग सादर करून सावित्रीचे दर्शन घडवले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालक सेवानिवृत्त मुख्याध्यापक कुमार स्वामी माने यांनी केले तर आभार प्रदर्शन जेष्ठ पत्रकार गंगाधर गच्चे यांनी मानले. स्वप्नाच्या गार्डन उपसरपंचनगर. बसवेश्वर नगर. झेंडा चौक परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सकल मुस्लिम आरक्षण कृती समिती, महाराष्ट्र राज्य, बीड यांच्या एल्गार मोर्चास मौलाना आझाद युवा मंचच्या जाहीर पाठिंबा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**माजलगांव - प्रतिनिधी**
**नाजेर कुरेशी**

**माजलगांव :** भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेल्या मूलभूत हक्कांच्या चौकटीत राहून मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी उभारण्यात आलेल्या या आंदोलनाला आम्ही पूर्ण समर्थन देतो. संविधानिक मार्गाने न्याय मिळवणे हा प्रत्येकाचा हक्क आहे, आणि तो हक्क मिळवण्यासाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणे ही लोकशाहीची ताकद आहे. मुस्लिम समाजाच्या ५% आरक्षणाच्या प्रश्नावर योग्य तो निर्णय व्हावा, यासाठी होणाऱ्या या एल्गार मोर्चास आम्ही नैतिक, सामाजिक व सक्रिय पाठिंबा देत



आहोत. हा लढा केवळ आरक्षणासाठी नसून, शिक्षण, रोजगार, समान संधी आणि सामाजिक न्याय मिळवण्यासाठी आहे. आम्ही सर्व समाजबांधवांना आवाहन करतो की, कायदा व सुव्यवस्था राखत, शांततेच्या मार्गाने या आंदोलनात सहभागी व्हावे. देशाच्या संविधानाचा आदर ठेवत आणि कायद्याच्या चौकटीत राहून आपले हक्क मागणे हीच खरी लोकशाही आहे, यावर आमचा ठाम विश्वास आहे. बीड जिल्ह्यात होणाऱ्या या एल्गार मोर्चात सहभागी होणाऱ्या सर्व बांधवांसोबत आम्ही खंबीरपणे उभे आहोत. अन्यायाविरोधात आवाज उठवणे हेच समाजाच्या प्रगतीचे लक्षण आहे, आणि या लढ्यात आमचा सहभाग कायम राहील.

**साबेर अन्सर कुरेशी**
**मौलाना आझाद युवा मंच,**
**बीड**



# पेनूर येथील सम्राट विचार मंचच्या वतीने रक्तदान शिबिर

## महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राबविले अनेक सामाजिक उपक्रम



**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**मोहोळ - प्रतिनिधी**
**राज खरात**

**पेनुर (ता.मोहोळ) :** येथील सम्राट विचार मंचच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पेनुर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक नवनाथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पणकरून सामूहिक त्रिशरण, पंचशील पठन करून अभिवादन करण्यात आले.

मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाजीराव पोवार यांनी रक्तदान शिबिरास भेट देऊन सम्राट विचार मंचच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करून सर्वच मंडळांनी असे उपक्रम राबवावेत असे आवाहन केले.

रक्तदान, जीवनदान या उदात्त हेतूने समाजाप्रती असलेली बांधीलकी जपत रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी रक्तदान शिबिराचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. यंदाचे हे पाचवे वर्ष असून त्यामुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन प्राप्त होते. अनावश्यक खर्चाला फाटा देत अभिनव पद्धतीने जयंती साजरी करण्याचा संकल्प केल्याचे आयोजक सौरभ आवारे यांनी सांगितले. यावेळी अण्णासाहेब देशमुख, जि. प. सदस्य चरणराज चवरे, सरपंच सुजित आवारे, माजी ग्रा. सदस्य राजेंद्र आवारे, प्रकाश चवरे, हरिदास सावंत, शिवाजी आवारे, राजू राजगुरू, पंकज अवचारे, तानाजी अवचारे, आनंद अवचारे, अण्णासाहेब आवारे, अण्णासाहेब सावंत,केशव पवार, लखन सोनवणे, गौरव आवारे, सुमित अवचारे, सुरज अवचारे, आर्यन ओहोळ, अजय गायकवाड, समर्थ फाळके ,सचिन गवळी, राम सोनवणे, काका आवारे, साहिल सावंत, भाऊसाहेब अवचारे, सुहास अवचारे, महादेव अवचारे, ऋषी कांबळे, पंकज पाखरे, ओम शिरसाट, श्रीधर पंडित आदिसह मंडळाचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिरूरमध्ये गुन्हेगारीचा सुळसुळाट

## अण्णा हजारे यांचे आशीर्वाद घेऊन निलेश वाळुंज यांचे बेमुदत सत्याग्रह आंदोलन सुरू

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**शिरूर- प्रतिनिधी**
**इंद्रभान ओव्हाळ**

**शिरूर :** शिरूर तालुक्यात व विशेषतः शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाढत्या गुन्हेगारीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात असून, बिनधास्त बंदूक फायरिंग, भारतीय राज्यचिन्हांचा गैरवापर, एमडी ड्रग्सचा सुळसुळाट, विविध अवैध धंदे, अवैध उत्खनन, वाढत्या चोऱ्या गुन्हेगारी कृत्य यामुळे सर्वसामान्य नागरिक भयभीत होत असून त्यामुळे 'कायद्याचे राज्य' धोक्यात येत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

निलेश वाळुंज यांनी सांगितले की अनेक वेळा सामाजिक हितासाठी तक्रारी करूनही गांभीर्याने दखल घेतली गेली नाही. तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष 'तहसिलदार' असतात पण त्यांनाही गांभीर्य नाही. समाजघातक व गुंड प्रवृत्तींकडून यापूर्वी वाळुंज यांना धमक्याही देण्यात आल्या आहेत. दुचाकी वाहनही जाळण्यात आले होते.



> 'अण्णासाहेब हजारे यांच्या आशिर्वादाने सामाजिक आंदोलन सुरूकरत असून, शिरूर तालुक्यात कायद्याचे राज्य व धाक अबाधित राहण्यासाठी आणि सामाजिक सुरक्षेसाठी हा सत्याग्रह आहे. प्रशासनाने तात्काळ मागण्यांबाबत ठोस कारवाई करावी. सामाजिक सुरक्षेसाठी आता रस्त्यावर उतरून लढा देणे गरजेचे झाले आहे.'
>
> **निलेश वाळुंज (सामाजिक कार्यकर्ता)**

**मुख्यमंत्री कार्यालयाच्या हालचाली**

दिनांक १० एप्रिल रोजी सदर प्रकरणाची दखल घेऊन विषय गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांकडे पाठविण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, अण्णा हजारे यांचे आशीर्वाद घेऊन निलेश वाळुंज यांनी राळेगण सिद्धी येथे जाऊन जनहितासाठी १५ एप्रिल २०२६ पासून शिरूर तहसील कार्यालय येथे बेमुदत सत्याग्रह आंदोलन सुरूकेले असून आंदोलनाचा आजचा दुसरा दिवस आहे. त्यांच्या आंदोलनाला तालुक्यामधून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत असून तालुक्यातील सर्व जनता त्या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त करीत आहेत.

**वाळुंज यांच्या सामाजिक मागण्या**

※ शिरूर साठी कर्तव्यदक्ष व निष्पक्ष असे दबंग पोलीस निरीक्षक यांची तात्काळ नियुक्ती

※ IPS दर्जाच्या DYSP अधिकारी यांची तात्काळ नियुक्ती

※ तालुक्यात एमडी ड्रग्स व गंभीर गुन्ह्यांची उच्चस्तरीय चौकशी

※ तालुक्यात 'एक गाव - एक पोलीस' उपक्रमाची तात्काळ अंमलबजावणी

※ शिरूर शहरसाठी स्वतंत्र पोलीस ठाणे

※ अवैध धंद्यांवर नियंत्रणासाठी पोलिस व राऊशू यांचे फ्लाइंग स्क्वॅड

※ रिक्त पोलीस पदे त्वरित भरणे

※ पोलिस ठाण्यांत नागरिकांना सौज्यन्याची वागणूक आणि तक्रारींचा योग्य निपटारा - अधिकाराचा गैरवापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई

※ अन्नापूरसह तालुक्यातील अवैध दारू, गुटखा व इतर अवैध धंदे कायमचे बंद करावे

# जुन्नरमध्ये वन्यजीव संवर्धनासाठी सर्पमित्रांची झटपट सेवा

## जनजागृतीतून मानव–वन्यजीव संघर्ष कमी करण्याचा प्रयत्न

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**जुन्नर - प्रतिनिधी**
**समीर मोरे**

**जुन्नर :** जुन्नर तालुक्यात वन्यजीव निसर्ग संवर्धन व वन्यप्राणी रक्षणासाठी कार्यरत असलेल्या 'वन्यजीव निसर्ग संवर्धन' संस्थेच्या सर्पमित्रांनी आपल्या धडाडीच्या आणि निस्वार्थ सेवेमुळे एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. दिवस असो वा रात्र, कोणतीही आपत्कालीन परिस्थिती असो - ही टीम तत्काळ घटनास्थळी धाव घेत वन्यजीवांचे प्राण वाचवण्याचे कार्य करत आहे.

ग्रामीण व शहरी भागात सापांविषयी असलेली भीती आजही मोठ्या प्रमाणात दिसून येते. अनेकदा अज्ञानामुळे सापांना मारले जाते. मात्र ही चुकीची समजूत दूर करण्यासाठी सर्पमित्र सातत्याने जनजागृती करत आहेत. साप हे पर्यावरणासाठी उपयुक्त असून ते शेतीतील उंदीर व इतर कीटकांचे नियंत्रण करतात, याबाबत



नागरिकांना योग्य माहिती दिली जात आहे. सध्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर तापमानात मोठी वाढ झाली असून गारवा, पाणी आणि आश्रयाच्या शोधात साप मानवी वस्तीत येण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचबरोबर मार्च ते मे हा कालावधी अनेक सापांच्या प्रजननाचा काळ असल्याने एकाच ठिकाणी दोन ते चार साप आढळण्याच्या घटना वाढल्या आहेत. अशा वेळी नागरिकांनी घाबरून न जाता सर्पमित्रांना संपर्क साधावा, सापांना इजा करू नये, असे आवाहन संस्थेकडून करण्यात येत आहे.

ही टीम केवळ सापांचेच नव्हे तर पक्षी, वन्यप्राणी आणि विशेषतः बिबट्यांच्या रेस्क्यूमध्येही सक्रिय आहे. मानवी वस्तीत आढळणाऱ्या जखमी पक्ष्यांना उपचारासाठी मदत करणे, बिबट्यासारख्या वन्यप्राण्यांविषयी जनजागृती करणे, तसेच त्यांना सुरक्षितरित्या त्यांच्या अधिवासात परत पाठवणे ही जबाबदारीही ते पार पाडत आहेत.

ज्या भागात बिबट्यांचे हल्ले होण्याची शक्यता अधिक आहे, त्या ठिकाणी विशेष जनजागृती मोहिमा राबवण्यात येत आहेत. नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी, रात्रीच्या वेळी कसे वागावे, पशुधन सुरक्षित कसे ठेवावे याबाबत मार्गदर्शन केले जाते. यामुळे मानव आणि बिबट संघर्ष कमी करण्यासाठी मोठी मदत होत आहे. या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आकाश माळी यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष दीपक माळी, खजिनदार सतीश घाडगे, सचिव हेमंत घाडगे तसेच सदस्य सुरेश गायकवाड, ऋषी वावळ, आदित्य हांडे, प्रज्ञेश काशीकेदार, जितू भोर,भाऊ घोडे आणि वैभव गावडे हे सर्पमित्र समर्पित भावनेने कार्य करत आहेत. स्वतःच्या वेळेचा व खर्चाचा विचार न करता समाजहित आणि पर्यावरण संवर्धन यासाठी ही टीम सदैव तत्पर असते.

वन्यजीव संरक्षणासोबतच पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करून समाजामध्ये सहअस्तित्वाची भावना वाढवण्याचा प्रयत्न या सर्पमित्रांकडून होत आहे. त्यांच्या या कार्यामुळे अनेक वन्यजीवांचे प्राण वाचले असून नागरिकांमध्येही सकारात्मक बदल दिसून येत आहे.

जुन्नर तालुक्यातील या सर्पमित्रांचे कार्य केवळ सेवा नसून पर्यावरण संवर्धनासाठीचा एक प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.

# डॉ.बाबासाहेबांच्या लढ्याची आठवण देत दौंडमध्ये पाण्यासाठी एल्गार; १७२ तासांची डेडलाईन

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**प्रतिनिधी**
**गणेश गावडे**

**दौंड :** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्यावर पाण्यासाठी ऐतिहासिक संघर्ष करून जवळपास एक शतक उलटले तरी आजही दौंड नगरपरिषद हद्दीतील अनेक दलित वस्त्यांना हक्काच्या पाण्यासाठी वणवण फिरावे लागत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. प्रशासनाच्या या तीव्र उदासीनतेविरोधात सामाजिक कार्यकर्ते अमर जोगदंड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना थेट नोटीस बजावली असून, १७२ तासांत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र कायदेशीर आंदोलनाचा इशारा दिला आहे. दौंडमधील भीमनगर,




सम्राटनगर, तुकाईनगर, साठेनगर, सिद्धार्थ नगर, नवगिरे वस्ती आणि जे. के. कॉलनी या वस्त्यांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून नियमित पाणीपुरवठा होत नसल्याच्या गंभीर तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. स्थानिकांनी वारंवार निवेदने आणि अर्ज देऊनही नगरपरिषद प्रशासनाकडून या समस्येचे निराकरण झालेले नाही. हा केवळ प्रशासकीय निष्काळजीपणा आहे की यामागे काही वेगळी कारणे आहेत, याची आता निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

या प्रकरणी अमर जोगदंड यांनी कायदेशीर पवित्रा घेत संविधानातील कलम १४, १५ आणि १७ चा दाखला दिला आहे. समानतेचा हक्क असतानाही विशिष्ट वस्त्यांना मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवणे हा घटनात्मक अधिकारांचा भंग असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या नोटिशीद्वारे त्यांनी प्रशासनासमोर काही रोखठोक प्रश्न उपस्थित केले असून, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. जर दिलेल्या १७२ तासांच्या मुदतीत पाणीपुरवठा सुरू झाला नाही, तर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार (Atrocity Act) तक्रार दाखल करणे, माननीय उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणे आणि लोकशाही मार्गाने उपोषणाला बसण्याचा इशारा देण्यात आला आहे. या अल्टिमेटममुळे आता दौंड नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासन काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# शेटफळ हवेली तलावातील पाण्याची खुलेआम लूट! नियम धाब्यावर - अधिकाऱ्यांचे मौन की संगनमत?

## कॅनलवर सायपन-मोटरांचा सुळसुळाट;विनापरवाना पाणी उचल

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**इंदापूर - प्रतिनिधी**
**बापू बोराटे**

**पुणे (इंदापूर) :** इंदापूर तालुक्यातील शेटफळ हवेली येथील ब्रिटिशकालीन ऐतिहासिक तलाव आज पाणी व्यवस्थापनाचे केंद्र न राहता 'पाणी चोरीचे अड्डे' बनले असल्याचा गंभीर आरोप समोर येत आहे. या तलावातून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना ठराविक नियम व अटींवर पाणी उचलण्याची परवानगी देण्यात आलेली असताना, अनेक शेतकरी कोणतीही परवानगी नसताना सर्रासपणे पाणी उचल करत असल्याचे धक्कादायक चित्र उघड झाले आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, काही जणांनी नियम अक्षरशः धाब्यावर बसवून मोठ्या प्रमाणावर पाण्याची चोरी सुरू ठेवली आहे. विशेष म्हणजे, या गंभीर प्रकाराकडे पाटबंधारे विभागाचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे. तलावातून निघणाऱ्या कॅनलवरही परिस्थिती काही वेगळी नाही. ठिकठिकाणी सायपन व मोटारी बसवून पाणी चोरीचा उघड उघड खेळ सुरू आहे. दिवस असो वा रात्र, नियमबाह्य पाणी उपसा सुरूच असून, या सर्व प्रकाराकडे संबंधित अधिकारी डोळेझाक करत असल्याचा आरोप होत आहे. यामागे 'चिरीमिरी'चा




खेळ तर नाही ना? असा सवाल आता सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत. विनापरवाना पाणी उचल करणाऱ्या शेतकऱ्यांकडून काही आर्थिक व्यवहार होत असल्याच्या चर्चा गावोगावी रंगू लागल्या आहेत. याहून धक्कादायक बाब म्हणजे, काही राजकीय नेते देखील या पाणी चोरीत सामील असल्याच्या चर्चा रंगत आहेत. इतर शेतकऱ्यांच्या नावावर घेतलेल्या पाणी परवानग्यांचा गैरवापर करून स्वतःच्या शेतात पाणी वळवले जात असल्याचे आरोप होत आहेत. त्यामुळे 'अधिकाऱ्यांचे संरक्षण की राजकीय दबाव?' असा सवाल आता जनतेतून जोर धरू लागला आहे. तसेच, कॅनलवर एका निवृत्त पाटबंधारे अधिकाऱ्याच्या नावाखाली मोटर लावून रात्रंदिवस पाणी चोरी सुरूअसल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, तरीही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संशय अधिकच बळावत आहे. 'हा निवृत्त अधिकारी कोण? आणि त्याच्यावर कारवाई का नाही?' असा थेट प्रश्न नागरिक विचारत आहेत. दरम्यान, या सर्व प्रकरणात पाटबंधारे विभागाची भूमिका संशयास्पद ठरत असून, अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाई करून दोषींवर कठोर पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

**शेवटचा इशारा:**

शेटफळ हवेली येथील तलावातून सुरूअसलेली ही पाणी चोरी आणि 'पाणी परवानगी'च्या नावाखाली चाललेला कथित भ्रष्टाचार याचा आम्ही लवकरच सविस्तर पर्दाफाश करणार आहोत. या प्रकरणात सहभागी असलेले अधिकारी, राजकीय व्यक्ती आणि इतर सर्व संबंधितांची नावे व पुरावे जनतेसमोर आणले जाणार आहेत.

**'सत्य बाहेर येणारचः आणि जबाबदारांना जाब द्यावाच लागणार!'**

# १००% निकालाची परंपरा कायम

## गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**माळशिरस - प्रतिनिधी**
**राजेंद्र पिसे**

**विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांच्या संयुक्त प्रयत्नांना उज्ज्वल यश**

**माळशिरस/मोरोची :** ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल, मोरोची येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या इयत्ता दहावीच्या निकालात शाळेने शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत पुन्हा एकदा उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाचा गौरव करण्यासाठी शाळेत गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या परीक्षेत शुभांगी कर्चे हिने ९७% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच श्रावणी कोरटकर हिने ९०% तर मौर्य निटवे याने ८५% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दत्तात्रय निटवे होते. यावेळी सचिव योगिता निटवे, मुख्याध्यापक लक्ष्मण पाटील, उपमुख्याध्यापक जिलानी आतार, गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर वरिष्ठ समन्वयक समीर पठाण यांनी प्रास्ताविक मांडत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. दत्तात्रय निटवे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पालक प्रतिनिधी संदीपान सुळ यांनी मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले, तर महावीर फुले यांनीही विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. उपमुख्याध्यापक जिलानी आतार यांनी विद्यार्थ्यांनी या यशावर न थांबता उच्च शिक्षणातही अशीच प्रगती साधावी, असे आवाहन केले.

मुख्याध्यापक लक्ष्मण पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेचा नावलौकिक अधिक वृद्धिंगत झाला असून भविष्यातही अशीच यशस्वी परंपरा कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला व कार्यक्रमाचे आभार मानले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा पवार व सुनंदा पवार यांनी मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली केले. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते.

# वाढत्या उष्णतेमुळे वन्यजीवांचा मानवी वस्तीकडे ओढा

## पिंपळगाव जोगा येथे शेकरूआढळल

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**जुन्नर - प्रतिनिधी**
**समीर मोरे**

**पिंपळगाव जोगा (ता. जुन्नर) :** सध्या वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे जंगलातील पाण्याचे स्रोत आटत चालले असून, वन्यजीव पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे येत असल्याच्या घटना वाढू लागल्या आहेत. अशीच एक घटना



पिंपळगाव जोगा येथे घडली असून, गावात दुर्मिळ असा शेकरू (भारतीय विशाल खार) हा प्राणी भरकटून आल्याचे निदर्शनास आले.

वाढत्या तापमानामुळे जंगलातील पाणवठे कोरडे पडत असून, अन्न व पाण्याच्या शोधात प्राणी गावाकडे वळत आहेत. अशा वेळी नागरिकांनी घाबरून न जाता प्राण्यांना त्रास देऊ नये, तसेच लगेच संबंधित रेस्क्यू टीम किंवा वनविभागाला कळवावे, असे आवाहन करण्यात



# उस्माननगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**उस्माननगर - प्रतिनिधी**
**लक्ष्मण कांबळे**



**नांदेड/उस्माननगर :** भारतीय घटनेचे शिल्पकार, विश्वरत्न, महामानव परमपूज्य, भारतरत्न डॉ. बाबासाहे आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त विविध ठिकाणी डॉ. बाबासाहेब अआंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले, उस्माननगर ता, कंधार येथील नागवंशीय मित्रमंडळाकडून उस्माननगर बसस्थानक शेजारी ग्रामपंचायत कार्यालय समोर डॉ बाबासाहेब आबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास मान्यवराच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण उस्माननगर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर बौद्धाचार्य तथा ग्रामपंचायत सदस्य अंगुलीमाल सोनसळे यांच्यासह सार्वजनिक बुद्ध वंदना घेण्यात आली.

त्यानंतर सहाय्यक पोलिस निरिक्षक संजय निलपत्रेवार यांनी बौद्ध अनुयायांना भीम जयंतीनिमित्त मार्गदर्शन केले मार्गदर्शन झाल्यानंतर बौद्ध अनुयायांकडून अन्नदानाचे (खिचडी) चे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स.पो.नि. संजय निलपत्रेवार, देवराव सोनसळे (संचालक), ग्रामपंचायत अधिकारी सौ.डी.ए.शिंदे , मुख्याध्यापक राहुल सोनसळे, उपसरपंच बाशीदभाई शेख ,शेकाप जिल्हाध्यक्ष बालाजी ईसाइकर, प्रा.विजय भिसे, ग्रामपंचायत सदस्या सौ.संगिताबाई भिसे, सामाजिक कार्यकर्ते अमिनशाह फकिर, चेअरमन रूद्र वारकड, ग्रामपंचायत सदस्य अंगुलीमाल सोनसळे, ग्रामपंचायत सदस्य कमलाकर शिंदे , युवा सेना उबाठा ता.प्रमुख संदिप पाटील काळम यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी वामण लोंढे सर, भगवान राक्षसमारे नरेश शिंदे, पोलीस पाटील विश्वभंर मोरे, रोहीदास कांबळे, गणेश शिंदे , गंगाधर कांबळे , सम्यक कांबळे ,पत्रकार गणेश लोखंडे, पत्रकार सुर्यकांत मालीपाटील, पत्रकार लक्ष्मण कांबळे, पत्रकार प्रदिप देशमुख, पत्रकार अमजद पठाण, संपादक बाजीराव पाटील गायकवाड कळकेकर, गुरूनाथ माने, शौकत अह्ली , जनाबाई कांबळे ,पोलीस मित्र उद्दव घोरबांड ,पोलीस कर्मचारी गणेश सुर्यवंशी , यांच्यासह बौद्ध उपासक, उपासिका व गावातील नागरिक अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते, हा कार्यक्रम वशस्वी करण्यासाठी जयंतीमंडळाचे अध्यक्ष हर्ष सोनसळे, उपाध्यक्ष सोनु पवार, सचिव अंकुश कांबळे, धम्मानंद कांबळे, राहुल सोनसळे, माणिक सोनसळे, स्वप्नील कांबळे , प्रमोद कांबळे, जिवन सोनसळे सचिन सोनसळे व उत्सव समितीचे अधिकारी, पदाधिकारी यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. सम्राट अशोक प्राथमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक राहुल सोनसळे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी शाळेचे शिक्षक भगवान रक्षसमारे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

जवाहरलाल ने. वि. वसतीगृहाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त वसतीगृहाचे कर्मचारी लक्ष्मण कांबळे यांच्या हस्ते प्रतिमचे पुजन करुन प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी उस्माननगर विभाग ग्रामीण मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष गणेश लोखंडे, विठ्ठल पाटील ताटे, सम्यक कांबळे, अमजद पठाण, सुर्यकांत मालीपाटील, बाजीराव पाटील गायकवाड कळकेकर, सौ. सविता कांबळे, सुप्रिया कांबळे व वसतिगृहातील विद्यार्थी उपस्थित होते. उस्माननगर विभाग ग्रामीण मराठी पत्रकार संघाच्या वतीने आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सभागृहात संपादक बाजीराव पाटील गायकवाड कळकेकर यांच्या हस्ते बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष गणेश लोखंडे, लक्ष्मण कांबळे, सूर्यकांत मालीपाटील, प्रदीप देशमुख, अमजद पठाण, विठ्ठल पाटील ताटे यांच्यासह अनेकांची उपस्थितीती होती.

**दि.१४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधुन उस्माननगर येथील बसस्थानक परीसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळ्यास ग्रामपंचायत कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी अभिवादन करून केले . त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालय उस्माननगर यांच्यावतिने 'भारताचे सविधान उद्देशिकाचे 'प्रति बौद्ध अनुयायांना, पत्रकार व जेष्ठ नागरिक, जेष्ठ नागरिक महिला यांना स.पो.नि.संजय निलपत्रेवार, ग्रामपंचायत अधिकारी सौ.डी.ए.शिंदे, देवराव सोनसळे, प्रा.विजय भिसे, रूद्र वारकड, बालाजी ईसादकर, संदीप पाटील काळम, अमिनशाह फकिर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.**

# चाकूर अहमदपूर मतदारसंघात मोठी राजकीय घडामोड, संघर्ष तीव्र होण्याची शक्यता!

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**चाकूर - प्रतिनिधी**
**शेख शकील**



**चाकूर :** चाकूर व अहमदपूर मतदारसंघाचे माजी आमदार व माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या नव्या राजकीय हालचालींमुळे मतदारसंघातील राजकारणात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पाटील हे शरद पवार यांच्या गटाला सोडचिठ्ठी देत थेट 'धनुष्यबाण' हाती घेण्याच्या तयारीत असल्याची चर्चा रंगली आहे.

विनायकराव पाटील यांच्या या संभाव्य निर्णयामुळे स्थानिक राजकारणात मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः त्यांच्या प्रमुख विरोधक आणि सध्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील (अजित पवार गट) यांच्यासाठी ही परिस्थिती अडचणीची ठरणार का, असा प्रश्न आता राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे. दोन्ही नेत्यांमध्ये पूर्वीपासूनच राजकीय स्पर्धा असल्याने, विनायकराव पाटील यांनी जर 'धनुष्यबाण' हाती घेतला, तर चाकूर व अहमदपूर मतदारसंघात थेट राजकीय सामना रंगण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी हा निर्णय निर्णायक ठरूशकतो. दरम्यान, विनायकराव पाटील यांचा प्रवेश जवळपास निश्चिन्त झालं आहे ही खात्री लायेक माहिती आहे , विनायकराव पाटील आत्ता कोणत्या तारखेला प्रवेश करतील अजून निश्चिन्त झालं नाही . त्यांच्या निर्णयामुळे चाकूर व अहमदपूर च्या राजकारणातही मोठे बदल घडू शकतात.

# खामसवाडी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**धाराशिव - प्रतिनिधी**
**समीर मुल्ला**



**धाराशिव :** कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मध्ये भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव बोधिसत्व परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सोसायटीचे चेअरमन संजय भाऊ पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सोसायटीचे व्हाईस चेअरमन मा.भगवान झोरी,मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे, फुले विचार मंचचे सावता माळी, बाबु नाना शेळके,बिभिषण कांबळे, लिंबराज खरटमोल, मारुती लोंढे,बालाजी चौरे,रेवण माळी,निलेश पाटील, नाना वैद्य, दशरथ शेळके, सादिक भाई सय्यद, सोसायटीचे सचिव विजयकुमार देशमाने, हनुमंत कदम, दत्तात्रय शेळके, बिभीषण कोळी, सहशिक्षक अनंत बाबर, सुर्यकांत सौदागर,सुमीत वाघे, यांच्याही हस्तेही प्रतिमेचे पूजन करून पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी या जयंती कार्यक्रमासाठी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसमतमध्ये डॉक्टर असोसिएशनचा जल्लोष डॉ.डिग्रसे अध्यक्षपदी विराजमान!

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वसमत - प्रतिनिधी**
**बालाजी अडकिने**



**वसमत :** वसमत शहरातील वैद्यकीय क्षेत्रासाठी सोमवार, दि.१३ एप्रिल २०२५ हा दिवस विशेष ठरला. प्रख्यात वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. नीलेश डिग्रसे यांच्या सुवर्णमहोत्सवी (५० व्या) वाढदिवसानिमित्त भव्य आणि उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याच वेळी डॉक्टर असोसिएशनच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात येत डॉ.डिग्रसे यांच्यावर अध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आली. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या साक्षीने डॉ.डिग्रसे यांचा वाढदिवस जल्लोषात साजरा करण्यात आला. सहकारी डॉक्टरांनी शुभेच्छांचा वर्षाव करत त्यांच्या वैद्यकीय सेवेतील योगदानाचा गौरव केला. संपूर्ण वातावरण आनंद, उत्साह आणि प्रेरणेने भरून गेले होते. दरम्यान, डॉक्टर असोसिएशनच्या नव्या कार्यकारिणीची अधिकृत घोषणा करण्यात आली. अध्यक्षपदी डॉ.नीलेश डिग्रसे, उपाध्यक्षपदी डॉ.गिरीश तांभाळे, सचिवपदी डॉ.निवृत्ती कुटे तर सहसचिवपदी डॉ. रेणुका पतंगे यांची निवड करण्यात आली. नव्या कार्यकारिणीकडून संघटनेच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रात नवे उपक्रम राबवले जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमाला माजी अध्यक्ष डॉ. एम. आर. क्यातमवार, आयएमए अध्यक्ष डॉ. बालासाहेब सेलुकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. गंगाधर काळे यांच्यासह डॉ. मसारे, डॉ. जवळेकर, डॉ. वैभव पडोळे, डॉ. नरहरी वाघमारे, डॉ. सनाउला खान, डॉ. राम भोसले, डॉ. पार्डीकर आदींसह डॉक्टर असोसिएशनचे अनेक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा देत, आगामी काळात वसमतमध्ये अधिक दर्जेदार व प्रभावी वैद्यकीय सेवा देण्याचा विश्वास व्यक्त केला.

# कोदाळी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

## मान्यवरांच्या उपस्थितीत प्रेरणादायी कार्यक्रम; ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**चंदगड - प्रतिनिधी**
**संदिप कांबळे**



**चंदगड :** कोदाळी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साह, जल्लोष आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. गावात सर्वत्र उत्सवी माहोल असून कार्यक्रमाला विविध मान्यवरांच्या उपस्थितीमुळे विशेष उंची प्राप्त झाली. संघर्ष बहुउद्देशीय सेवा संस्था, कोदाळी यांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व वृक्ष देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील पदाधिकारी, ग्रामस्थ व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. मधुकर जाधव सर यांनी बाबासाहेबांच्या जीवनकार्याचा प्रभावी आढावा घेत 'त्यांचे विचार केवळ वाचण्यासाठी नसून आचरणात आणण्यासाठी आहेत,' असा संदेश दिला.

चंदगड पंचायत समितीचे सभापती विलास नाईक यांनी समाजातील एकोपा, शिक्षण आणि प्रगतीसाठी बाबासाहेबांचे विचार अंगीकारण्याचे आवाहन केले. उपसभापती संज्योती मळवीकर यांनी 'जनतेच्या सेवेसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत,' असे सांगत विकासकामांना गती देण्याचे आश्वासन दिले. जिल्हा परिषद सदस्या रचना गावडे यांनी बाबासाहेबांच्या कार्याचे स्मरण करून उपस्थितांना प्रेरित केले. गटनेते पांडुरंग बेनके यांनीही मार्गदर्शन करत समाजजागृतीचा संदेश दिला. या कार्यक्रमास कोल्हापूर जिल्हा परिषद महिला व बालकल्याण सभापती विद्या पाटील, जि. प. सदस्या रचना गावडे, पंचायत समिती सभापती विलास नाईक, उपसभापती संज्योती मळवीकर, गटनेते पांडुरंग बेनके, सरपंच योगिनी दळवी, उपसरपंच विठ्ठल गावडे, सामाजिक कार्यकर्ते अंकुश गावडे, निंगू दळवी, सदस्या अनुराधा कांबळे, ग्रामपंचायत अधिकारी शिवाजी गायकवाड, प्राथमिक शाळेच्या प्र. मुख्याध्यापिका सौ. सागरिका कुटे, शिक्षक महेश ढोले यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदिप कांबळे यांनी केले, तर आभार विलास कांबळे यांनी मानले. शेवटी सर्वांनी बाबासाहेबांच्या विचारांचा अवलंब करून समाज परिवर्तनासाठी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# आजचे राशि भविष्य

**मेष :** मतभिन्नता आणि दडपण यामुळे तुम्ही चिडचिडे आणि बैचेन व्हाल. जर तुम्ही कुणाकडून आपली उधारी माघात असाल आणि तो काही कारणास्तव तुमच्या गोष्टीला टाळत असेल तर, आज तो न बोलता तुम्हाला पैसे परत करेल.

**वृषभ :** संयम बाळगा, आपले निंरतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. अचानक पैसा आल्याने तुमची प्रलंबित बिले आणि ताबडतोब करावयाचे खर्च भागतील.

**मिथुन :** तुमच्या आजाराबद्दल चर्चा करणे टाळा. तुमच्या दुखण्यावर तुम्ही जितकी जास्त चर्चा कराल तेवढी तुमची व्याधी वाढत जाणार, म्हणून इतर दुस-या कामामध्ये स्वत:ला गुंतविणे श्रेयस्कर. कोणतीही गुंतवणूक घाईगडबडीत करू नका.

**कर्क :** तुमचे मनमोकळे आणि निडर विचार तुमच्या मित्राला तुमचा गर्व आहे असे वाटून तो दुखावला जाईल. महत्त्वाच्या व्यक्ती कधीही आर्थिक मदत द्यायला तयार असतील.

**सिंह :** प्रत्येकाला मदत करण्याच्या इच्छेमुळे तुम्ही आज थकून जाल, दमून जाल. तुमच्या जीवनसाथी सोबत मिळून आज तुम्ही भविष्यासाठी काही आर्थिक योजना बनवू शकतात आणि अपेक्षा आहे की, ही योजना यशस्वी होईल.

**कन्या :** दु:खात असलेल्या व्यक्तीला मदत करून तुम्ही ऊर्जा मिळवा. इतरांच्या उपयुक्त ठरत असेल तर मदत करणे हेच संयुक्तिक आहे नाहीतर नश्वर देहाचा उपयोग तो काय ही बाब लक्षात ठेवा.

**तुळ :** तुमचे आवडते स्वप्न प्रत्यक्षात येईल. परंतु तुमचा उत्साह नियंत्रणात ठेवा. कारण खूप आनंदी होणे हे कधी कधी समस्येत टाकू शकते. व्यापारात आज चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** राग अनावर झाल्याने बाचाबाची आणि संघर्ष होऊ शकतो. आकर्षक वाटणा-या योजनेत गुंतवणूक करण्यापूर्वी वरवर विचार न करता त्याच्या मूळाशी जा. गुंतवणूक करण्यापूर्वी आणि कोणताही शब्द देण्यापूर्वी तज्ञांशी बोलून घ्या.

**धनु :** खेळावर काही रक्कम खर्च करा, कारण निंरतर चिरस्थायी तरुणाईचे ते गुपित आहे. घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल.

**मकर :** चार भिंती बाहेरील खेळांचे तुम्हाला आकर्षित करतील. ध्यानधारणा आणि योगाचा तुम्हाला फायदा होईल. काही जणांसाठी प्रवास केल्याने थकून जाल आणि तणाव वाढला तरी आर्थिकदृष्ट्या फायद्यात राहाल.

**कुंभ :** आरोग्यविषयक प्रश्नांमुळे कदाचित तुम्हाला अशांततेचा सामना करावा लागेल. आपल्या माहितीतील लोकांमुळे उत्पन्नाचा नवा स्रोत सुरूहोईल. कुटुंबिय अथवा मित्रांबरोबरील स्नेहमेळाव्यामुळे आजचा दिवस एकदम उत्तम आणि छान जाईल.

**मीन :** ज्येष्ठांनी त्यांच्या जास्तीच्या ऊर्जेचा वापर सकारात्मक गोष्टींसाठी करून त्याचा चांगला लाभ घ्यावा. आज धन लाभ होण्याची शक्यता आहे परंतु, असे होऊ शकते की, आपल्या रागीट स्वभावाच्या कारणाने तुम्ही पैसा कमावण्यात सक्षम होणार नाही.

# हे तुम्हांला माहिती आहे का ?

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**





१. भारतात एक गाव आहे जिथे घरांना दार नाहीत - शनी शिंगणापूर (महाराष्ट्र)
२. जपानमध्ये एक रेल्वे स्टेशन आहे जे फक्त लोकांना नैसर्गिक दृश्य बघायला थांबतं, तिथे चढणं-उतरणं शक्य नाही.
३. मानवी शरीरात इतकं लोखंड आहे की त्यातून एक छोटी खिळी तयार होऊ शकते.
४. पृथ्वीवरील सर्वात थंड ठिकाण अंटार्क्टिका नाही तर त्याच्या काही विशिष्ट दऱ्या आहेत, जिथे तापमान −98°C नोंदवलं गेलं.
५. घड्याळात '४' अंक बहुतेक वेळा खखखख असा लिहिला जातो, खत ऐवजी.
६. पांडा आपलं जवळपास १४-१६ तासांचं आयुष्य फक्त बांबू खाण्यात घालवतो.
७. स्वित्झर्लंडमध्ये फक्त एक पाळीव गिनी पिग ठेवणं बेकायदेशीर आहे, कारण त्यांना एकटं वाटतं.
८. कोळी आपल्या आयुष्यात १०,००० पेक्षा जास्त जाळी विणतो.
९. जगातल्या सर्व नद्यांचा मिळून ९९% गोडं पाणी फक्त २० देशांमध्ये आहे.
१०. मानवी DNA चं धागं उलगडून लांब केलं तर ते सूर्यापर्यंत आणि परत ६०० वेळा पोहोचेल.
११. उंटाच्या नाकपुड्या वाळू आत जाऊ नये म्हणून बंद होऊ शकतात.
१२. जगातील सर्वात लहान युद्ध ब्रिटन आणि झांझिबार यांच्यात झालं - फक्त ३८ मिनिटं चाललं.
१३. भारताचा "Kumbh Mela" हा अंतराळातून दिसणारा एकमेव मानव-सभेचा मेळावा आहे.
१४. चॉकलेट कुत्र्यांसाठी घातक ठरूशकतं कारण त्यातलं थिओब्रोमीन त्यांचं हृदय थांबवू शकतं.
१५. आयफेल टॉवर उन्हाळ्यात तापमानामुळे १५ सें.मी. जास्त उंच होतो.

**❋ टीप : वरील माहितीर्ची दैनिक चालु वार्ता वृत्तपत्र कोणत्याही प्रकारे पुष्टी करत नाही**



# सुर्य आग ओकतोय....
# भीषण गर्मीत तळपतोय महाराष्ट्र

जागतिक उष्णता वाढिचा परीणाम म्हणून या पुढे ही संपूर्ण जगाला मानवाने निर्माण केलेला भौतिक सुविधा साठी निसर्गाचा ऱ्हास जो होत आहे त्याचे परिणाम भविष्य समोरच्या पिढीला भोगावे लागतील...

अजुन वेळ गेलेली नाही. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जनजागृती होणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र राज्यातील विदर्भ भागात सर्वाधिक तापमान वाढीमुळे उष्माघात मुळें जिवीतहानी होण्याची शक्यता आहे.

राज्यात १६ ते २२ एप्रिल पर्यंत भीषण गर्मी राहणार आहे. हृदयविकार व श्वसनाचे आजार: अति उष्णतेमुळे हृदयावर ताण वाढून हृदयविकाराचा झटका आणि श्वसनाचे आजार बळावतात. डिहायड्रेशन व थकवा: शरीरातील पाणी आणि मीठ कमी झाल्यामुळे चक्कर येणे, मळमळ आणि स्नायूंमध्ये पेटके (cramps) येणे. शहरी उष्णता बेट शहरांमध्ये काँक्रीटमुळे उष्णता जास्त काळ टिकून राहते, ज्यामुळे रात्रीही तापमान जास्त राहते आणि आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. कामकाजावर परिणाम: उष्णतेमुळे पिके व पशुधन धोक्यात येते, तसेच बाहेरील कामांची उत्पादकता कमी होऊन आरोग्य सेवांवर ताण पडतो.

कोणाला जास्त धोका? वृद्ध, लहान मुले, उन्हात काम करणारे मजूर आणि गरोदर महिलांना याचा धोका सर्वाधिक असतो. प्रतिबंधात्मक उपाय:जास्तीत जास्त पाणी किंवा सरबत प्यावे.दुपारी १२ ते ४ या वेळेत थेट उन्हात जाणे टाळावे. सुती व हलक्या रंगाचे कपडे वापरावेत. उष्णतेच्या लाटेचे शरीरावर होणारे परिणाम क उष्णतेमुळे आपल्या शरीरावर काय परिणाम होतो? शरीर गरम झाल्यावर

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वसमत - प्रतिनिधी
बालाजी अडकिने

रक्तवाहिन्या पसरतात. हे रक्तदाब कमी करते आणि संपूर्ण शरीरात रक्त परिसंचरण करण्यासाठी हृदयाला कठोर होते. हवामान बदलामुळे लोकसंख्येचा उष्णतेचा धोका वाढत आहे. जागतिक स्तरावर, तीव्र तापमानाच्या घटना त्यांची वारंवारता, कालावधी आणि परिमाण यांमध्ये वाढत असल्याचे दिसून येते. उष्णतेच्या लाटेचा मानवी शरीरावर गंभीर परिणाम होऊ शकतो. वातावरणाचे तापमान ३७ डिग्री सेल्सियस असते तो पर्यंत मानवी शरीराला त्याचा काही त्रास होत नाही मात्र त्या नंतर मात्र शरीर वातावरणातील उष्मा शोषून घेऊ लागते आणि अति उष्णतेमुळे शरीरावर होऊ शकतात हे गंभीर परिणाम? उष्णतेचा ताण ? अति उष्णतेमुळे शरीराचे तापमान नियंत्रित करणे कठीण होते, ज्यामुळे घाम जास्त प्रमाणात येतो बर्फ लावणे (सूज): सूज आलेल्या भागावर बर्फ लावल्यास सूज आणि वेदना कमी होतात. लघवीत जळजळ जास्तीत जास्त पाणी प्या आणि नारळ पाणी किंवा ताक घ्या. यामुळे शरीरातील उष्णता कमी होते. राज्यात वाढत्या तापमानामुळे उष्णतेची लाट अधिक तीव्र होत असून लहान मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उन्हाळ्यात मुलांना 'हीट क्रॅम्प' आणि 'हीट एक्झॉशन' सारख्या समस्या उद्भवू शकतात. हात-पाय दुखणे, चक्कर येणे, उलट्या होणे, जास्त घाम येणे आणि अशक्तपणा अशी लक्षणे दिसल्यास तात्काळ सावध होणे गरजेचे आहे. अशा वेळी मुलांना पाणी किंवा जठड देणे आवश्यक असून गरज असल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. उष्माघात गंभीर ठरूशकतो योग्य कपडे घाला भरपूर पाणी पाजा लहान मुलान थोड्या थोड्या वेळाने पाणी पाजत राहा. लिंबू सरबत, ओआरएस (जठड), नारळ पाणी द्या. ' हलके, सैल आणि सुती कपडे

आवश्यक असेल तेव्हाच बाहेर जाण्याचा प्रयत्न करा.

स्वत: ची काळजी घ्यावी शक्यतो घरी थांबा, आपण सुखी तर घर सुरक्षित.

**हवामान अभ्यासक**
**डि आर कऱ्हाळे जिंतूर**

# 'सशक्त महिला, सशक्त राष्ट्र'चा संदेश; अंबाजोगाईत भव्य नारी शक्ती रॅली

## 'नारी शक्ती वंदन रॅली ही केवळ एक कार्यक्रम नसून महिलांच्या सक्षमीकरणाचा एक मोठा उत्सव आहे - आमदार नमिताताई मुंदडा'

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
बीड /अंबाजोगाई प्रतिनिधी -
किशोर फड

**बीड/अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरात आज 'नारी शक्ती वंदन रॅली' मोठ्या उत्साहात पार पडली. अक्षय निवास ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावर निघालेल्या भव्य मोटारसायकल रॅलीत महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. शहरातील विविध भागांतून आलेल्या माता-भगिनींनी प्रखर उन्हाची पर्वा न करता उत्साहाने रॅलीत भाग घेतला.

या रॅलीत महिलांची एकजूट, जिद्द आणि आत्मविश्वास पाहायला मिळाला. 'सशक्त महिला म्हणजे सशक्त राष्ट्र' हा संदेश देणारी ही रॅली सर्वांच्या लक्षवेधी ठरली. महिलांच्या अधिकार, सन्मान आणि समान संधी यासाठी सुरू असलेल्या चळवळीला या उपक्रमामुळे अधिक बळ मिळत असल्याचे चित्र दिसून आले. यावेळी





केज मतदारसंघाच्या आमदारांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, 'नारी शक्ती वंदन रॅली ही केवळ एक कार्यक्रम नसून महिलांच्या सक्षमीकरणाचा एक मोठा उत्सव आहे. महिलांनी सर्व क्षेत्रांत पुढे येऊन नेतृत्व करणे ही काळाची गरज आहे. केंद्र शासनाने लागू केलेल्या 'नारी शक्ती वंदन अधिनियम'मुळे महिलांना लोकसभा व विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण मिळणार असून, यामुळे देशाच्या लोकशाहीला अधिक बळकटी मिळेल.' तसेच त्यांनी पुढे सांगितले की, येत्या १६, १७ आणि १८ एप्रिल या कालावधीत महिला सन्मानाचे विविध उपक्रम राबविण्यात येणार असून, महिलांच्या सहभागामुळे हे दिवस खऱ्या अर्थाने उत्सवमय ठरणार आहेत. या रॅलीत सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करणाऱ्या सर्व महिला व आयोजकांचे आमदारांनी मन:पूर्वक आभार मानले.

# काजळेश्वर येथे ज्ञानसूर्य विश्व रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती दिनी अभीवादन सोहळा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कारंजा लाड - प्रतिनिधी
अशोकराव उपाध्ये

**कारंजा :** कारंजा तालुक्यातील ग्राम काजळेश्वर येथे विश्वरत्न ज्ञानसूर्य भारतीय राज्य घटणेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या १३५ व्या जयंती दिनी त्यांना ठिकठिकाणी भावपूर्ण विनम्र अभिवादन दि १४ एप्रील राजी सकाळ पासूनच उत्साही वातावरणात करण्यात आले. ग्रामपंचायत भवन येथे अभीवादन सोहळा गावचे सरपंच नितीन पाटील विष्णूपंत उपाध्ये; उपसरपंच तैसीमभाई तथा समस्त ग्रामपंचायत सदस्य गण यांचे प्रमुख उपस्थित आयोजीत होता. याप्रसंगी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर; महात्मा ज्योतीबा फुले यांचे प्रतीमांचे पुजन व हारार्पन उपस्थित मान्यवरांनी



करून त्यांना विनम्र अभिवादन केले. या अभीवादन सोहळ्यात गावातील मान्यवर तथा ग्रामपंचायत कर्मचारी यांनीही महामानवांना मानवंदना दिली. गावातील बौद्ध विहार येथेही महात्मा भगवान गौतम बुद्ध; ज्ञानाचा अथांग सागर महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेबांच्या प्रतीमांचे पुजन व हारार्पन करून त्यांना विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी बौद्ध उपासक उपासिका महिला वर्गानेही महामानव डॉ बाबासाहेबांना मानवंदना दिली. आयुवैदीक उपचार केंद्रात वैद्यकीय अधीकारी डॉ. प्रशांत वाघमारे यांनी त्यांच्या वैद्यकीय पथकासह भारतीय राज्यघटणेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेचे पुजन करून त्यांना विनम्र नमन केले. या सह गावातील शाळा; विद्यालये तथा विवीध आस्थापनेत समानता व न्यायाचे महान प्रवर्तक डॉ . बाबासाहेब यांना विनम्र अभिवादन केल्या गेले. डॉ .बाबासाहेबांचे अथक प्रयत्नामुळेच भारतात समता; स्वातंत्र्य आणि बंधुता या मुल्यावर आधारीत संविधान निर्माण केले . डॉ बाबासाहेबांचे विचार प्रेरणादायी आणि मार्गदर्शक असल्याने त्यांचे विचाराचे स्मरण करून त्यांचा जयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

# ग्रामीण भागातून उभी राहिली यशकथा

## ३० लाखांचा विक्रम गाठणारा तरुण

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
तलासरी - प्रतिनिधी
सुधीर घाटाळ

**तलासरी :** पारंपारिक शेतीला पूरक असलेल्या वराहपालन व्यवसायाने आज ग्रामीण तरुणांसाठी नवी संधी निर्माण केली आहे. कमी खर्चात अधिक उत्पन्न देणारा हा व्यवसाय दिवसेंदिवस लोकप्रिय होत असून तलासरीतील अनिकेत सोनवाल यांनी या क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवत इतरांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे.

आसनगाव येथील कृषी तंत्र विद्यालयातून कृषी विषयात पदविका पूर्ण केल्यानंतर अनिकेत यांनी अवघ्या २१व्या वर्षी वराहपालन व्यवसायाला सुरुवात केली. स्वत:ची जमीन नसतानाही भाडेतत्त्वावर जागा घेऊन त्यांनी हा व्यवसाय उभारला. योग्य नियोजन, कठोर परिश्रम आणि कुटुंबाचा पाठिंबा यामुळे त्यांनी या क्षेत्रात यशाची नवी उंची गाठली आहे. आज ते वर्षाकाठी सुमारे ३० लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळवत आहेत.

या व्यवसायातील यशामागे खर्च नियंत्रणाची महत्त्वाची भूमिका आहे. हॉटेल, मेस, ढाबे तसेच लग्नसमारंभातील



उरलेले अन्न आणि भाजीपाल्याचा वापर करून त्यांनी कमी खर्चात प्रभावी खाद्य व्यवस्थापन केले. त्यामुळे उत्पादन खर्च कमी राहून नफा वाढवण्यात त्यांना यश आले.

स्थानिक तसेच बाहेरील बाजारपेठेत वराहाच्या मांसाला मोठी मागणी असल्याने विक्री सहज होते. अनेक ठिकाणी थेट फार्मवरच विक्री केली जात असून ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळते. त्यामुळे हा व्यवसाय अधिक फायदेशीर ठरत आहे.

नियोजनबद्ध संगोपनामुळे उत्पादनात सातत्य राहते. वराह मादी वर्षातून दोनदा पिल्लांना जन्म देते आणि ही पिल्ले ६ ते ७ महिन्यांत विक्रीयोग्य होतात. योग्य देखभाल केल्यास प्रत्येक वराहाचे वजन ८० ते ९० किलोपर्यंत पोहोचते. अनिकेत यांनी वर्षाकाठी सुमारे १५ टन वराह विक्री करून मोठा आर्थिक लाभ मिळवला आहे.

नोकरीच्या मागे न लागता नियोजनपूर्वक वराहपालन व्यवसाय सुरू केल्यास तरुणांना चांगले उत्पन्न आणि स्थैर्य मिळू शकते असे मत अनिकेत सोनवाल यांनी व्यक्त केले.

तलासरीतील या तरुणाचा यशस्वी प्रवास आज अनेक युवकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, शेतीसोबत पूरक व्यवसायाची योग्य जोड दिल्यास आर्थिक प्रगती साधता येते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीत मुनेश्वर कुटुंबाचा अनोखा उपक्रम

## मोतीचूर लाडूंनी साजरा केला आनंदोत्सव

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
किनवट - प्रतिनिधी
शुभम शिंदे

**किनवट :** महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त सार्वजनिक जयंती महोत्सव समिती तसेच भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. जयंतीचा मुख्य सोहळा सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ पार पडला. यावेळी पंचशील ध्वजवंदनाचा कार्यक्रम भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामुदायिक वंदना, तसेच विविध सामाजिक उपक्रमांद्वारे जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान विविध ठिकाणी अन्नदान, पाणी व शीतपेय वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. जेतवन बुद्ध विहार तसेच इतर ठिकाणीही पंचशील ध्वजवंदन करण्यात आले. विविध पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, शिक्षक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला.

चौकट

किनवट नगरपरिषदेच्या नगरसेविका ललिता मारुती मुनेश्वर व सामाजिक कार्यकर्ते मारुती मुनेश्वर यांनी विशेष उपक्रम राबवत मोतीचूर लाडूंच्या मिठाई बॉक्सचे वाटप करून १४ एप्रिलचा आनंद साजरा केला. त्यांच्या या उपक्रमात हजारो नागरिकांनी सहभाग घेत मिठाईचा आनंद लुटला. यासोबतच मुनेश्वर कुटुंबीयांनी शहरातील विविध ठिकाणी अन्नदानाचेही आयोजन करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली.

# जीवनज्योती महिला प्रभाग संघामार्फत पिंक रिक्षा चे वाटप

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत जीवनज्योती महिला प्रभाग संघ, गोवर्धन अंतर्गत सुर्या महिला ग्रामसंघ

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नाशिक - प्रतिनिधी
समाधान भावनाथ

**नाशिक :** विल्होळी येथे दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी नाविन्य पूर्ण योजना राबविण्यात आली या योजनेतून महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी, महिला सुरक्षितता व रोजगार मिळण्यासाठी जीवनज्योती महिला प्रभाग संघामार्फत पिंक रिक्षा चे वाटप करण्यात आले. पिंक रिक्षा चे उद्घाटन गट विकास अधिकारी सोनिया नाकाडे मॅडम यांनी केले. उद्घाटन प्रसंगी जिल्हा अभियान व्यवस्थापक बंडू कासार सर तालुका अभियान व्यवस्थापक स्वप्निल शिर्के सर, विस्तार अधिकारी ग्रामपंचायत सानप सर, सोनवणे सर, ग्रामपंचायत अधिकारी पांडुरंग सोळंके, तालुका व्यवस्थापक पूनम वाघ मॅडम, तालुका व्यवस्थापक राहुल सोनवणे, प्रभाग समन्वयक मखराम राठोड, प्रशासक सौ.जानकाबाई





चव्हाण, उपसरपंच भास्कर थोरात, ग्रामपंचायत सदस्य संजय गायकवाड., ग्रामसंघ पदाधिकारी, CRP पुष्पा सोनकांबळे, CRP शोभा वाघ उपस्थित तसेच बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंदेरी येथील वृध्द महिलेचा अकस्मिक मृत्यू

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मंडणगड - प्रतिनिधी
उमेश तबीब

**मंडणगड :** दि. १४- मंडणगड तालुक्यातील पंदेरी कुंभारवाडी येथील आनंदीबाई धोंडू पंदिरकर वय (७२) यांच्या अकस्मिक मृत्यूची नोंद मंडणगड पोलीस स्थानकात १३ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आली आहे. या संदर्भात मंगेश धोंडू पंदिरकर यांनी पोलीस स्थानकात खबर दिली असून या खबरीतील माहीतीनुसार मयत आनंदीबाई धोंडू पंदिरकर वय (७२) राहणार पंदेरी कुंभारवाडी या त्यांची सुन सौ.वृषाली रघूनाथ पंदीरकर राहणार सांताक्रुज मुंबई यांच्याकडे राहण्यासाठी गेल्या होत्या त्या ६ एप्रिल २०२६ रोजी बोरीवली बोरथळ बसने पंदेरी येथे गावी परत येण्यासाठी निघाल्या होत्या त्या घरी परत पोहचल्या नसल्याने फिर्यादी यांनी गावात आजूबाजूच्या परिसरात व नातेवाईकांकडे त्यांचा शोध घेतला असताना त्या मिळून आल्या नाहीत म्हणून ते मंडणगड पोलीस ठाण्यात त्या नापता असल्याची तक्रार देण्यासाठी येणार होते परंतू १२ एप्रिल २०२६ रोजी ०६.३० वाजता पेवे जेटी येथे खाजनात आणि कांदळवन भागात बेवारस प्रेत सापडले आहे अशी माहीती फिर्यादी यांना मिळाली त्यामुळे फिर्यादी यांनी समक्ष जावून खात्री केला असता बेवारास सापडलेला महिलेचा मृतदेह हा आपल्या आईचा मृतदेह असल्याची खात्री फिर्यादी यांना पटल्याने मंडणगड पोलीस स्थानकात आमृ क्रमांक ०४/२०२६ बी.एन.एस.एस. १९४ प्रमाणे मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# वाई येथे महामानवाला अभिवादन...!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मारेगाव - प्रतिनिधी
देवा आत्राम

**यवतमाळ :** आज भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राळेगाव येथील त्यांच्या प्रतिमेला गावकरी, अनुयायी आंबेडकरी यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य



व विचारांचे स्मरण करत समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांच्या आदर्शांचा अवलंब करण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, बंधुता आणि न्याय या विचारांचा प्रसार अधिक प्रभावीपणे करण्याचे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमास वाई परिसरातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, स्थानिक नागरिक, राजू उमरे, प्रकाश भगत, नीलिमा ताकसंडे, व युवक-युवती तसेचअनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुविचार

'यश हे मेहनत, संयम आणि सातत्य यांचा संगम आहे.
ज्याने हार मानली नाही, तोच खरा विजेता ठरतो.'